# प्रस्तावना.

प्रस्तुतकाळीं आपल्या ह्या भरतखंडांत दयाळु इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून पुष्कळ विद्या प्रसार झाला; तणेंकरून बऱ्याच लोकांना लिहिणें, वाचणें, याची अभिरुचि लागली. परंतु आपल्या भाषेंत अशा प्रकारचे ग्रंथ विपुल नाहींत. त्यामुळें ती उणीव कमी व्हावी एतदर्थ विद्वानांनीं अनेकप्रकारें देशसेवा करण्याचें मनावर घेतलें. कोणीं वर्तमानपत्रें काढिलीं, कोणीं कल्पित कादंबऱ्या रचिल्या, कोणीं संस्कृत नाटकांचीं भाषांतरें केली; कोणीं इंग्रजी ग्रंथांचे तर्जुमे मराठी भाषेंत लिहिले. सारांश त्यांनीं जेणेंकरून आर्यपुत्रांना वाचण्यास अधिक मजकुर सुलभ रीतीनें मिळेल असा प्रयत्न केला. कै. वे. सं. रा. रा. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या जगन्मान्य विख्यात निबंधमालेंत प्राकृत भाषेंत उत्तम प्रकारचे निबंध लिहून सर्वप्रकारें भाषेची सरणी एकसारखी केली. हें त्यांचे सर्व आर्यजनांवर महदुपकार झाले आहेत. तेव्हां आपण ही कांहीं मातृसेवा करावी; असा हेतु मानसांत उत्पन्न झाला. परंतु मजला संस्कृत ज्ञान नसोन मी पदधारी ही नाहीं. तेव्हां हें लोकरंजनाचें महत्कृत्य पूर्णत्वानें सिद्धीस कसें जातें, अशी चिंता उत्पन्न झाली. पण इतक्यांत पंताच्या सर्वमान्य आर्येचें स्मरण झालें. "काव्य करावें म्यां नच वचकावें दूषितो परि लघूस ॥ कांन सदन बांधावें कीं त्यांत पुढें विळें करिल घूस ॥ त्याप्रमाणें बरेंवाईट एखादें पुस्तक रचून सुज्ञांचें पुढें आणावें असा मनाचा पुरता विचार करून अल्पमतीनें

मी ही स्वकपोल कल्पित कादंबरी देश बांधवां पुढें ठेवीत आहे. आतां यांत पुष्कळ दोष असतील यांत संदेह नाहीं. परंतु प्रथमचा प्रयत्न असल्यामुळें विद्वजनांनीं फारशी करडी नजर न करितां मराळ पक्षाप्रमाणें कांहीं गुण असल्यास ग्रहण करून दोष मजला कळविले असतां मी त्यांचा फार फार आभारी होईन. आणि कदाचित् पुढें दुसरें एखादें करण्यास उत्तेजन आलें; किंवा दैवानें याच्या दुसऱ्या आवृत्या निघाल्यास त्या चुका दुरुस्त करीन. या पुस्तकांत प्राकृत भाषेंतील इतर कादंबऱ्यासारखा पाल्हाळ न करितां व तींच ती वर्णनें पुनः पुन्हा न करिता थोडक्यांत आटपतें घेतलें आहे. तसेंच वियोगजन्य दुःखाचें वर्णन फारसें न लांबवितां लौकरच संपविलें आहे. कारण सगळ्या काल्पित ग्रंथांची सरणी बहुतेक एकच रीतीची असल्यामुळें वाचणाराना त्याची रुचि न लागून कंटाळा मात्र येतो त्याप्रमाणेंच या पुस्तकांतील भाषणें नेहमींच्या प्रचारांतलि भाषे प्रमाणें साधीं चटकदार वातलीं आहेत. तात्पर्य आजपर्यंत आपल्या भाषेंत जीं काल्पित पुस्तकें झालीं आहेत त्यांपेक्षां याची रचना अगदींच निराळी केली आहे. असो या पुस्तकापासून यत्किंचित जरी मनोरंजन झालें, तरी माझ्या श्रमाचें साफल्य झालें असें मी मानीन. तें सकल ब्रह्मांड कर्त्याच्या कृपेनें सिद्धीस पावो.

ग्रंथकर्ता,

सदाशिव विष्णु देशमुख.

स्कू. मा. रावणगांव. ता. भीमथडी.

श्रीगजाननप्रसन्न.

## श्लोक.

सुधाकरीं शीत प्रदेश होतो ॥ जगांप्रती तीव्र बहुत देतो ॥
पहा किती सुंदर वेळ आली ॥ मुशाफरा कामिनि माळ घाली ॥

सकळ सृष्टीचा निर्माणकर्ता जो जगच्चालक अनंतरूपी परमेश्वर त्याच्या कर्तृत्वानें सर्वव्यापक व प्राण्यांना आधारभूत असा तेजोरश्मी श्री सूर्यनारायण आपल्या कोमल किरणांनीं मंदगतित्व पावून अस्ताचला प्रत जात आहे. अशा समयीं संपूर्ण जन जे आहेत, ते आपापले दिवसभर केलेले व्यापार बंद करून रात्रीचा विश्रांति मार्ग स्वीकारण्याच्या तयारीस लागले आहेत. कृषीकर्म करून शांत झालेले हलधर आपल्या वृषभांस मुक्त करून नगराकडे त्यांसमवेत चालले आहेत, कोणी क्षेत्रांतील माळांना उदक पूर्ण करून मार्ग बंद करीत आहेत, कोणी रात्रौ आपल्या वृषभादिकरून पशूंना भक्षण्याकरितां तृणादि सामग्री मस्तकावर घेऊन चालले आहेत, कोणी उदईक अमुक कर्मे करावयाचीं अशा गप्पा मारीत मोकळेच चालले आहेत. स्त्रीसमुदायही आपापलीं कामें आटपून मस्तकावर कांहीं फळफळावळ, भाजीगला, काष्ठ वगैरे घेऊन लगबगीनें आपल्या तान्ह्या अर्भकांची भेट घेण्याकरितां उत्कंठेनें चालले आहेत. त्या वेळची ती अपूर्व शोभा अ-

वलोकन करून मन चकित होत आहे. अशा समयीं मदनबाण राजपुत्र, आणि रूपसुंदर प्रधानपुत्र त्याचा मित्र, असे उभयतां आपल्या अत्युत्तम शृंगारलेल्या सुंदर अश्वावर आरोहण करून वनश्री पहात पहात एका सर्वोत्कृष्ट सरोवराचे तीरावर येऊन पोहोंचले.

त्या वेळेस त्या सरोवराची अवर्णनीय शोभा अवलोकन करून दोघांचीं मनें संतोष पावलीं. व दिवसभर झालेले प्रवासाचे श्रम परिहार झाले. सरोवरामध्यें सहस्त्ररश्मि भगवान् अस्ताप्रत चालला होता, त्याचें तें प्रतिबिंब मनोहर दिसत आहे, व शुभ्र-लाल अशीं कमल पुष्पें आपापल्या पांकळ्या मिटीत आहेत, तेणेंकरून तो देखावा कांहीं चमत्कारिकच दिसत होता. त्या समयीं—

रा० मद०—मित्रा, आजच्या दिनीं आपल्या मार्गांतील श्रमांचें मला कांहींच दुःख वाटत नाहीं. कारण, हें रम्य स्थळ पाहून मजला असें वाटतें कीं, अक्षयीं अशा स्थळीं वास्तव्य करावें. आजचा मुक्काम याच ठिकाणीं व्हावा अशी माझी इच्छा आहे.

तें मित्राचें भाषण श्रवण करून—

प्र० रूप०—महाराज, आपल्या मनीषबाहेर मी नाहीं. परंतु सांप्रतकाळीं आपणापाशीं कोणत्याही प्रकारची सामग्री नसल्यामुळें नगरांत गेलेंच पाहिजे. त्यांत आपण व तसेच आपले घोडे यांना कालपासून कांहीं खाण्यास नसल्यामुळें आपण उभयतां व ते दिनासारखे दिसत आहेत. याकरितां

नगरांत जाऊन पुढील तजविजीस लागलें पाहिजे. प्रस्तुत आपण आपली या स्वच्छ स्फटिकासारख्या उदकानें तृषा भागवावी म्हणजे पुढील मार्ग स्वीकारण्यास ठीक पडेल.

याप्रमाणें उभयतांचीं मंजुळ भाषणें झाल्यावर ते दोघेही घोड्यावरून खालीं उतरले, मुखें प्रक्षाळलीं, व तें निर्मळ उदक आनंदानें प्राशन करते झाले.

नंतर घोड्यावर स्वार होऊन नगरांत जाण्याकरितां निघाले. तें भद्रपूर नगर जरी लहान मांडलिक राजाचें राजधानी शहर होतें, तरी मोठें रमणीय व टुमदार होतें. त्या नगरांत विशेषें करून गुर्जर व मारवाड देशस्थ लोकांची वस्ती फार असल्यामुळें व्यापार मोठा चालत असे. कारण वरील लोक हे उगीच रिकामे म्हणून बसावयाचे नाहींत. कांहीं तरी अल्प स्वल्प उद्योग केल्यावांचून त्यांस चैन पडावयाचें नाहीं. आणि खरोखर पाहतां मनुष्यानें उद्योगी असावें, हें फार चांगलें आहे; त्या योगें मनुष्याची प्रतिष्ठा वाढून त्यास भूषणास्पद होतें. कोणी कारागीर आपलीं दुकानें आटपण्याच्या विचारांत आहेत, कोणी दुकानांत रोषनाई करीत आहेत, कोणी सुवर्णकार आपल्या गिऱ्हाईकांना त्यांचे तयार झालेले अलंकार देत आहेत, व आपलें योग्य वेतन मागत आहेत, कोणी व्यापारी सुवर्णाच्या चिपा दाखवीत आहेत, कोणी मोत्यें, हिरे, माणकें, पाच, पुष्पराग वगैरे रत्नें काढून श्रीमंतांना दाखवीत आहेत. ज्या

ज्या दुकानांत जो माल आहे, तो जेथल्या तेथें कांचेच्या तावदानांत योग्य रीतीनें मांडलेला पाहून पाहणारांस एके प्रकारचें आश्चर्य वाटून मन आनंदानें प्रफुल्लित होत आहे. असा तो सुंदर देखावा अवलोकन करीत ते उभयतां नगरांतील भव्य धर्मशाळेंत येऊन उतरले.

त्या धर्मशाळेंतही ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें उत्तम प्रकारें जागेची व्यवस्था केलेली असे. अशी ती सुरेख रीति व जागा पाहून राजपुत्र समाधान पावला. प्रधानपुत्रानें सर्व साहित्य आणल्यावर त्या श्रमित झालेल्या अश्वांस अगोदर दाणा दिला. आणि मग आपण पाक-निष्पत्ति करूं लागला. कांहीं वेळानें उभयतांचीं भोजनें झाल्यावर इकडील तिकडील गप्पा मारीत आनंदांत काळ घालवीत आहेत, इतक्यांत एक सुंदर पोषाख केलेला वयानें सुमारें पंधरा सोळा वर्षांचा देखणा असा मुशाफर घोडा फेंकीत धर्मशाळेच्या कांठाजवळ येऊन पोहोंचला. व हे कोणी तरी श्रीमान मुशाफर असावे असें जाणून, त्यांस मोठ्या नम्रतेनें लवून मुजरा केला. तेव्हां त्या उभय गृहस्थांनींही त्याची ती ऐट व लीनता पाहून त्याचा मुजरा मोठ्या सत्कारानें स्वीकारिला, आणि त्यास खालीं उतरण्याची विनंति केली. परंतु मुशाफर ह्मणाला, महाराज, मजला फारच जरूरीचें काम असल्यामुळें जाण्याची त्वरा आहे; तेव्हां क्षमा करा, आणि जाण्यास हुकूम द्या. राजपुत्र ह्मणाला,

अहो आपण जसे मुशाफर तसेच आह्मीही मुशाफरच आहोंत. क्षणैक विश्रांति घेऊन तुह्मी आह्मी बरोबरच मार्ग क्रमण करूं. मग तुह्मी आपल्या कार्याला जा, आमचा मार्ग तिकडे असला तर आह्मीही तिकडेच येऊं. असा राजपुत्राचा अत्याग्रह झाल्यामुळें त्यासही मग नाहीं असें स्पष्ट म्हणवेना. तेव्हां तो घोड्यावरून खालीं उतरला, त्यास दाणा दिला; व धर्मशाळेंत त्यांचे जवळ मोठ्या अदबीनें येऊन बसला. राजपुत्रानें त्यास विचारिलें, आपण कोण, जातां कोठें, व असें निकडीचें काम तरी काय आहे; हें कळेल तर संतोष होईल.

तेव्हां मुशाफर म्हणाला, तें आपण विचारूं नये; व मीही सांगूं नये, हें चांगलें आहे. अशा त्याच्या संदिग्ध भाषणानें तर राजपुत्रास ऐकण्याची फारच उत्कंठा झाली. राजपुत्र आग्रहानें त्यास विनंती करूं लागला कीं, ज्या वृत्त-श्रवणानें आमचें अहित आहे, अशी चमत्कारिक हकीकत तरी काय आहे, ती कळल्यावांचून अंतःकरण शांतता पावणार नाहीं. तेव्हां निरुपायास्तव मुशाफरानें सांगण्याचें कबूल केलें.

त्या वेळेस दोन प्रहर रात्रीचा समय झालेला होता. धर्मशाळेंत या तिघांशिवाय अन्य कोणीही नव्हतें. रात्र बाहेर किर्र अशा भयंकर स्वरूपानें आपलें तें अंधकाररूपीं तेज प्रगट करून, मानवांस भयप्रद होत होती. त्या समयीं चौर्य कर्म करणारे तस्कर मात्र

त्या तमोमय रजनीमध्यें निष्काळजीनें इकडून तिकडे कानोसा घेत फिरत होते.

अशा त्या भयंकर वेळीं मुशाफर म्हणाला, महाराज, सांप्रत रात्रही पुष्कळ झाली आहे, धर्मशाळेंत दुसरें कोणी नाहीं, परंतु भय व लज्जेस्तव सांगण्यास शरम वाटते. आपण उभयतां नरसिंह असतां भीतीचें कारण नाहींच. पण लज्जा आपला स्वभाव सोडून दूर होत नाहीं. असो, आपल्या दुराग्रहास्तव आतां खरें वर्तमान कथन करितों, आपणांसारख्या सद्‌गृहस्थाजवळ सत्य श्रुत करण्यास संशय नकोच. याबद्दल खात्री झालीच आहे. महाराज, अनंगपूर नगर आपणांस ऐकून ठाऊक असेलच. त्या नगरच्या कुसुमचाप राजाची मी कन्या, मला पुष्पावती असें ह्मणतात. हे शब्द ऐकतांच राजपुत्र व प्रधानपुत्र आश्चर्यानें चकीत होऊन गोंधळांत पडले. त्या समयीं त्यांची ती स्तब्ध वृत्ति पाहून मुशाफररूपी पुष्पावतीनें भाषणास आरंभ केला. ती ह्मणाली, महाराज, मी असा मर्दानी पोषाख धारण करून मुशाफर झाल्याची हकीकत सांगतें, व मी अबला जातीची असून आपणांपाशीं निःशंक व निर्भिडतेनें भाषण करतें; याबद्दल दासीला क्षमा असावी. तेव्हां राजपुत्र म्हणाला, तुमच्या प्रस्तुतच्या स्थितीला माफीचें कारण नाहीं, व अमर्यादाही होत नाहीं. आपण खुशाल बोलावें.

पुष्पावती म्हणते, महाराज, माझ्या सुस्वरूपाची

कीर्ति सर्व जगतांत प्रसिद्ध झाल्यामुळें अनेक राजानीं व राजपुत्रांनीं मला वरण्याविषयींच्या मागण्या केल्या. परंतु कांहीं माझे पित्यास व कांहीं मजला अमान्य झाल्यावरून आम्ही कोणालाही अनुमोदन दिलं नाहीं; तेणेंकरून संपूर्ण राजे व राजपुत्र निराश होऊन मी कोणत्या उपायानें प्राप्त होईन, याबद्दलचा विचार करूं लागले. त्यांत तमाळ देशचा राजा क्रूरसेन याजपाशीं लढाऊ फौज फार असल्यामुळं तो मदानं उन्मत्त झाला होता. व त्यास आपल्या शौर्यगामी सैन्याचा फार अभिमान होता. त्यानं माझे पित्यास मागणी घातली. तो स्वरूपानं अत्यंत कुरूप असल्यामुळं माझे पित्यास त्याचं ह्मणणं मान्य झालं नाहीं. त्यामुळं त्यास बहुत क्रोध येऊन तो आपलं अवाढव्य सैन्य घेऊन माझे पित्याचे नगरावर ऐन दोन प्रहरचे ग्रीष्म ऋतूंतील कडक उन्हाळ्याचे दिवस, सूर्याच्या प्रखरतर तापानं जन त्रस्त आहेत, अशा वेळीं चालून आला. व एकाएकीं सर्व नगरांत कहर करून सो-डला. आमच्या फौजेची मुळींच तयारी नसोन श-त्रूची वार्ताही नसल्यामुळं कोणीही सावध नव्हतं. कोणी त्या प्रज्वलित तापाचं निवारण करण्याकरितां बागेंतील थंड हवेंत निद्रिस्त झालेले आहेत; कोणी गिरिशिखरावरील शीत हवेंत आराम करीत आहेत; खुद्द सरकार माझे पिते हे मकरंदोद्यानांतील शीत बं-गल्यांत विलासांत निमग्न होते. अशा वेळेस त्यांस ही दुर्वार्ता कळली कीं, शत्रु चालून येऊन त्यानं सर्व

नगराची धूळधाण केली. हे शब्द ऐकतांच माझे पित्याचं मुख खरकन उतरलं, व तो कोळशासारखा काळा ठिक्कर पडला. व आतां काय करावं, हें त्यास कांहींच सुचेना, तो भ्रमिष्टासारखा करूं लागला. तेव्हां प्रतापशाली शौर्यसागर प्रधान व सेनापती यांनीं येऊन विनंति केली कीं, शत्रूनं सर्व नगर काबीज केलं, व राजवाड्यावर चाल केली आहे; थोडक्याच अवकाशांत राजवाडाही हस्तगत होईल, असं दिसतं. आपणांस या संकटाची स्वप्नींसुद्धां वार्ता नसल्यामुळं आपली तयारी अगदींच नाहीं. त्यांत आपले लोकही जाग्यावर नाहींत. याजकरितां शत्रूकडील लोकांच्या भाषणावरून हा दुष्ट **क्रूरसेन** राजा आपल्या **पुष्पावती** बाईसाहेबावर लोभाविष्ट होऊन इतका क्रोधानें खवळलेल्या सिंहासारखा संतप्त होत्साता आलेला आहे, तर आम्हा सर्वांस या वेळेस असं वाटतं कीं, आपलं संपूर्ण राज्य संरक्षण करावयाचं असल्यास या संकटाचं मूळ जी **पुष्पावती** ती त्यास देऊन आपला बचाव करावा आणि नीतींतही असंच कथन केलं आहे—

### श्लोक.

त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलंत्यजेत्
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथ्वींत्यजेत्

कुळरक्षण होत असून जर एक मनुष्य जाईल तर द्यावें. व यांत कांहीं नाश होत नाहीं. इतकेंच कीं **क्रूरसेन** अंमळ कुरूप आहे, परंतु बलाढ्य आहे. आ-

णखी परमेश्वराचा नेमानेमच. त्यांनीं त्यास वरिलें असावें असा ईश्वरी संकेत दिसतो. त्यास कोणाचा उपाय नाहीं. हें प्रधान सेनापतींचें भाषण राजास दुर्धर विषापेक्षांही कटु लागलें. त्यानें त्यांचा धिक्कार केला. आणि ह्मणाला शौर्यसागर नामाभिधान कशाला पावलां? क्षत्रिय कुळांत जन्म घेऊन अशी नपुंसकासारखी मसलत सांगतां. चला, उठा, कंबरा बांधा; आणि शत्रूचा पाडाव करा. असा भीतीचा अंगिकार करून भागुबाईसारखे घरांत बसूं नका. धैर्य धरा, तरवार घ्या, श्रीशंकरकृपेनें शत्रूचा नाश करूं. शत्रु ह्मणजे पदार्थ काय! हें राजाचं वीरश्रीचं व खोंचणीचं भाषण ऐकून त्या वीरांस आवेश चढला, नेत्र लाल झाले, बाहुस्फुरण पावूं लागले. नंतर लागलीच तरवारी सरसावून युद्धाचा नगारा ठोकला. आणि मोठ्या वीरश्रीनें शत्रूवर तुटून पडले. परंतु शत्रु घरांत येऊन पोहोंचलेला, व यांचं सैन्यही सर्व जाग्यावर नाहीं. त्यामुळें यांचं कांहींएक चाललं नाहीं. बहुतेक लोक जखमी झाले. कित्येक लोक यमपुरीस गेले.

तेव्हां निरुपाय झाल्यामुळं पुष्पावतीस द्यावं असं सर्वांनुमतानं ठरलं. ही वार्ता मजला श्रुत होतांच मी मूर्छित झालें, सर्वांगास कंप सुटला, आणि एकदम रडं कोसळलं; तें कांहीं केल्या आंवरेना. पुढील तें दुःख एकदम मूर्तिमंत पुढं उभं राहिल्यासारखं झालं. काय सांगूं महाराज, माझी त्या वेळेस जी अवस्था झाली, तिचें शब्दांनीं वर्णन करणें फार कठीण आहे. त्यांत

मी स्त्री; मजला शब्दसंग्रहही अवगत नाहीं. आपण जर त्या वेळेस असतां आणि माझी ती दशा अवलोकन केली असती, तर आपण दुःखसागरांत बुडूनच गेलां असतां. अशी जरी अवस्था झाली, तरी मानसांत असा विचार केला कीं, जर मी येथें असा विलाप करीत बसलें आणि तो दुष्ट क्रूरसेन आला तर मग फारच दुर्धर प्रसंग आपल्यावर येणार. तेव्हां तो नरपशु येण्याच्या अगोदरच कांहीं युक्ति योजून आपली सुटका करून घ्यावी. मग मी तात्काळ एका शिपायाचा वेष घेतला. आणि मुशाफराचा पोषाख व कांहीं अलंकार, जवाहीर व नक्त वगैरे द्रव्य बरोबर घेऊन आपल्या मंदिरांतून बाहेर पडलें. त्या वेळेस मी वेष पालटल्यामुळं व त्या धरा, मारा अशा धांदलींत सर्व गुंतले असल्यामुळं मला कोणी ओळखलं नाहीं. नंतर तशीच अश्वपागेंत जाऊन माझ्या सवयीचा हा निळा घोडा होता ; याजवर सामान घालून भीतभीत मोठ्या कष्टानं नगराच्या बाहेर पडलें. आणि नशिबावर हवाला टाकून, आपल्या जन्मभूमीस शेवटचा रामराम करून, घोडा भरधांव काढला. बाळपणापासून मला घोड्यावर बसण्याचा नाद फार होता; त्यामुळें या वेळेस घोडा भरधांव काढण्याचं मला कांहींच कठीण वाटलं नाहीं. ती मी फिरत फिरत सांप्रत आपणांपाशीं येऊन पोहोंचलें. या गोष्टीस आज तीन दिवस झाले. अशा रीतीनं मजवर प्रस्तुत आलेल्या संकटाचं म्यां निवारण केलं आहे परंतु महाराज! माता पिता माझ्या

विरहानें आपले प्राण देतील कीं काय! याची मात्र अत्यंत चिंता लागली आहे. परमेश्वर काय करील तें खरं!!! मजवांचून त्यांस क्षणभर सुद्धां चैन पडत नसे. आतां या स्थळीं येण्यास मला इतकी रात्र होण्याचें कारण आज मी मार्गांत उष्णतेच्या प्रखर तापानं फार पीडीत झाल्यामुळं कांहीं वेळ विश्रांति घ्यावी, अशा उद्देशानं रस्त्याच्या एकीकडे एका आम्रवृक्षाच्या दाट छायेंत बसल्यें असतांना तशीच निद्रा लागली. जागृत होऊन पहात्यें तों अस्तमानाचा समय झाला आहे; मग तशीच घोड्यावर बसून मार्ग सुधारला. नगरांत येऊन उतरण्याची जागा शोधीत असतां ही धर्मशाळा दृष्टीस पडली. व आपण सत्पुरुष नरसिंह दृगोचर झालां तेव्हां येथें आल्यें. अशी माझी हकीकत आहे ती अक्षरशः खरी आपणांस निवेदन केली, याप्रमाणें ती करुणपर हकीकत श्रवण करून राजपुत्र मदनबाणाचें अंतःकरण मनस्वीच दुःखी झालें. राजपुत्र दुःखाचा सुस्कारा टाकून ह्मणाला, गतगोष्टीस तर आतां उपाय नाहीं. आपण स्वस्थ असावें. आमच्या हातून आपलें जितकें हित होईल तितकें करण्याविषयीं आम्ही प्रयत्न करूं. जास्त वल्गना करण्यांत अर्थ नाहीं. आतां रात्र फार झाली तेव्हां आपण सर्वांनीं कांहीं वेळ निद्रा घ्यावी ह्मणजे दिवसाच्या तापानें कडक व घर्मानें शिथिल झालेलीं गात्रें स्वस्थता पावतील. याप्रमाणें भाषण झाल्यावर तिघेंही मोठ्या बंदोबस्तानें व हुशारीनें निद्रिस्थ झालीं.

# भाग दुसरा.

दुसरे दिवशीं अरुणोदयाच्या सुमारास ते जागृत होऊन शौचमुखमार्जन करिते झाले. नंतर वर्ण धर्माप्रमाणें प्रातःस्मरण वगैरे कर्मे सारून त्यांनीं घोड्यावर खोगिरें ठेविलीं, व स्वार होऊन मार्गक्रमण करूं लागले. त्या वेळेस प्रभातकाळचा सुंदर समय असून किंचित् थंडीची झुळूक येत असल्यामुळें गारवा लागत होता. सूर्योदय होण्यास थोडा अवकाश असल्यामुळें आकाशाचा रंग लाल दिसत आहे, पक्षी आपलीं घरटीं सोडून भक्ष्यार्थ भ्रमण करण्याच्या नादांत आहेत, पांथस्थ मार्ग क्रमीत आहेत, तपस्वी स्नानें करून तपश्चर्येस लागले आहेत, तों श्रीभगवान् आपल्या मृदु किरणांनीं उदयाचलावर प्राप्त झाला. मग अंमळ थंडीची पीडा कमी होऊं लागली. हे तिघे मुशाफर अस्ते अस्ते चालले होते. तेव्हां मुशाफररूपी पुष्पावती या उभयतांस ह्मणाली, महाराज, आपण माझा सविस्तर वृत्तांत ऐकून घेतला, परंतु आपण दयासागर, वीरसिंह कोण आहांत, याबद्दल मज दासीवर अनुग्रह होईल, तर अत्यानंद होणार आहे. आपल्या या मदनतुल्य स्वरूपावरून आपण राजकुलांत जन्म धारण केला असून वीरमातेला धन्य केलें असेल हें उघड दिसत आहे. परंतु एकवार आपलं सकल वृत्त श्रवण करावं असं वाटतं; तेणेंकरून कर्ण एक-

ण्यास कसे तल्लीन झाले आहेत; तर महाराज, कृपा होईल अशी आशा आहे. आमचे वाचकही त्यांचें वृत्त ऐकण्यास उत्सुक झाले असतील यांत संशय नाहीं. यावरून त्यांचे वृत्तांचें दिग्दर्शन या भागांत करावें हें योग्य आहे.

**रा० म०**—हे सौंदर्यवल्ली, चंचलनेत्रे कुमारिके, आह्मी उभयतां बाळपणापासून एकेच ठिकाणीं वाढलों असल्यामुळें आमचें मित्रत्व फार वृद्धिंगत झालें. व त्यांत हा माझा मित्र **रूपसुंदर** खरोखर मित्रत्वास फारच योग्य आहे. शास्त्रांत जसें मित्राचें लक्षण कथन केलें आहे, त्यापेक्षांही याचे गुण जास्त असावेत, यांत किमपीही शंका नाहीं. याच्या मित्रत्वास उपमा देण्यास सृष्टींत वस्तूच नाहीं ह्मटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. याचें वर्णन शब्दांनीं करणें कठीण. असा हा खरा जिवलग मित्र आहे. याच्या संगतीनें मी फार सुखी आहें. मी **क्रीडावती** नगरीचा जो प्रख्यात व कीर्तिमान राजा **मदनराय** त्याचा एकुलताएक पुत्र. मला **मदनबाण** ह्मणतात, व हा माझा स्नेही आमच्या **प्रतापसिंह** प्रधानजीचा पुत्र. यास **रूपसुंदर** ह्मणतात. आह्मी उभयतांनीं लहानपणापासून एकेच ठिकाणीं विद्याभ्यास केला. अभ्यासांत आमची तत्परता पाहून आमचे गुरुजी, त्याचप्रमाणें आमचे पिते फार संतोष पावले. सृष्टिनियमाप्रमाणें आह्मी सकलविद्येंत पूर्ण झालों. गुरुजींनीं आह्मांस मुख्य न्यायशास्त्र, ज्योतिष, व्याकरण, अलंकारशास्त्र,

भूगोल, खगोल, प्राचीनकाळच्या नामांकित राजांचे इतिहास, त्याचप्रमाणें वीर पुरुषांचीं चरित्रें यांचा अभ्यास करविला. आणि मग व्यवहारज्ञान आणि तर्कशास्त्र यांतही आह्मांस प्रवीण केलें, व राजकुमारांस अवश्य अशी जी युद्धकला तीही आह्मांस शिकविली. तेणेंकरून आह्मांस शत्रूची परवा वाटेनाशी झाली. धनुर्विद्येंत तर आह्मी इतके निष्णात झालों कीं, कोठेंही व कशाहीं बिकट ठिकाणांत शत्रु असला, तरी अचुक शर टाकून त्याचा नाश केल्यावांचून कधींही राहवयाचे नाहींत. आतां आपल्या मुखानें आपली प्रशंसा करणें आमच्या सारख्यांस योग्य नाहीं; परंतु समयानुरूप वर्णन करणें भाग पडलें. कारण,त्याशिवाय आमच्या वृत्ताचें पुष्टीकरण होणार नाहीं. आह्मा भूगोल विद्येंत प्रवीण झालों याबद्दल मागें सांगितलेंच आहे. त्या योगानें आह्मांस सृष्टी चमत्कार पहाण्याची फारच उत्कंठा झाली. व याच वयांत जर आपण ही गोष्ट केली तर होणार आहे, नाहीं तर एकदां कां राज्यकारभार आंगावर पडला, ह्मणजे मग ही आपली मनेच्छा तृप्त होणार नाहीं, असें जाणून आह्मी पूर्ण विचार करून मातापित्यांचें अनुमोदन घेण्याकरितां त्यांस आह्मी आपला विचार कळविला. त्यावर त्यांचें मत असें पडलें कीं, अल्पवयांत प्रवासास जाणें योग्य नाहीं. याजकरितां अंमळ प्रौढ झालां ह्मणजे मग तुह्मी आपला संकल्प सिद्धीस न्या. पण आह्मांस या गोष्टीची इतकी उतावळी झाली होती कीं, कांहींही

होवो, परंतु देशपर्यटन करून यावयाचेंच. असा आमचा पूर्ण निश्चय झाला. मग आह्मी मृगयेच्या निमित्तानें जे घोडेस्वार झालों, ते तसेच प्रवासास निघालों. मार्गानें आह्मांस ठिकठिकाणीं जो आनंद झाला, व जे आह्मी अपूर्व सृष्टीचमत्कार अवलोकन केले, तेणेंकरून आह्मी फार समाधान पावलों. असें आह्मी सृष्टीसौंदर्य पहात पहात काल सायंकाळीं वरील नगरांत येऊन वास्तव्य केलें. पुढें आपल्या अलभ्य भेटीचा लाभ झाला.

याप्रमाणें ते एकमेकांच्या वृत्तभरांत निमग्न असल्यामुळें घोडे चालतात किंवा नाहीं याचेंही भान त्यांस राहिलें नाहीं. यामुळें पुढें त्यांस असें कळलें कीं, नऊ वाजण्याचा सुमार झाला असून आपण नगरापासून सारे दीड मैल लांब आलों आहोंत; तेव्हां राजपुत्रानें प्रधानपुत्र मित्रास सांगितलें कीं, उष्मा फार होऊं लागला, आतां मार्गक्रमण होणें नाहीं. याजकरितां येथें जवळपास कोठें छाया व उदक असल्यास उतरावें, असें मला वाटतें. रूपसुंदर म्हणाला फार उत्तम आहे, शोध करितों. नंतर त्यानें आसपास तपास करितां तेथून एक मैलावर लहानशी नदी वहात असून तिचें उदक स्वच्छ आहे, व तीरावर आम्रवृक्षाची छाया फार सुरेख आहे. त्यामुळें ती सुशोभित व मनोहर जागा त्याचे पसंतीस पडून तो घोडा दवडीत, हे उभयतां ज्या ठिकाणीं होते, तेथें आला; आणि त्यांस तिकडे घेऊन गेला. त्या उभ-

यतांभीं ती थंड व रमणीय जागा पाहून **रूपसुंदराची** फार तारीफ केली. नंतर घोडे बांधून **रूपसुंदर** साहित्य आणण्याकरितां नगरांत निघून गेला. तेव्हां राजपुत्र **मदनबाण** व राजकन्या **पुष्पावती** हीं दोघें मात्र त्या ठिकाणीं राहिलीं. मग काय, एकांतवास, सुंदर जागा, व दोघेंही एकमेकांच्या रूपावर लुब्ध झालेले, हें म्हणजे सांगावयास नको. **पुष्पावतीनें** ज्या वेळेस धर्मशाळेंत **मदनबाणास** अवलोकन केलें, तेव्हांपासून ती त्यास मोहीत झाली होती. कां होणार नाहीं ! ज्याप्रमाणें **पुष्पावतीस** पाहिजे होतें त्याप्रमाणें सर्व गुणांनीं परिपूर्ण, सरळ नासिक, उंचभाळ, रुंद वक्षस्थळ, सुवर्णासारखी सुरेख कांती, त्यांत तरूण, केवळ दुसरा मदनच,अशा सुंदरास पाहून कोण भुलणार नाहीं ! पूर्वीं तिनें जाण्याची त्वरा दाखविली खरी, परंतु तिच्या मनांत जावयाचें नव्हतें. तरी सदरील गृहस्थ कोण,त्याचा स्वभाव कसा वगैरे समजल्याशिवाय एकदम त्याच्याशीं तिला संवट्टन करितां येईना. त्यामुळें तिनें त्या वेळेस तशी बतावणी केली. मदनरती साक्षात् मृत्युलोकीं अवतरली कीं काय ? अशी कल्पना करण्यांत मोठेंसें साहस होणार नाहीं. कारण, मदनरती यांस भूलोकांतील कोण्याही व्यक्तीनें पाहिलें नसून केवळ ग्रंथांतील मनोहर वर्णनावरूनच कल्पना करावयाची. तद्वत् वरील भाषणही अप्रयोजक होईल असें वाटत नाहीं. असो. तेव्हां ते उभयतां टकमक एकमेकांकडे पाहात स्तब्ध होऊन

लज्जायमान झाले. त्या वेळेस त्यांची कशी अवस्था झाली असेल याची कल्पना सुज्ञ वाचकांनींच करावी. तेव्हां--

पु०--महाराज, अमर्याद होऊन आपणाशीं भाषण करतें याची क्षमा असावी. हे शृंगारसुंदरा, आपल्या स्वरूपाची कीर्ति मी ऐकून होतें. परंतु सांप्रतकाळीं ती खरी मूर्ति माझे नेत्रांसमोर प्रत्यक्ष उभी आहे. तेणेंकरून मी आनंद सागरांत गटांगळ्या खात आहें. माझी प्रिय दासी माझे बहिणीचे सासरीं तिच्याबरोबर गेली होती. त्यावेळेस आपल्या ( मदनबाणाच्या ) बहिणीनं पुष्कळ तसबिरी आणल्या होत्या. त्यांत आपलीही मोहक तसबीर होती. ती माझे दासीनं फार सुरेख जाणून हळूच घेतली. आतां चोरून घेण्याचं कारण मागून देतील न देतील असं समजून वरील युक्तीनं घेऊन तिनं आमच्या नगरांत परत आल्यावरतीं सुंदर मनमोहन भेट मजला दिली. तेव्हांपासून ( लाजून व पायांकडे बोट दाखवून ) मी हे चरण आपल्या हृदयसंपुटांत दृढ धरून बसलें आहें. माझा दृढ निश्चयच होता कीं, जर हे चरण प्राप्त झाले, तरच त्यांस हा देह अर्पण करावयाचा; नाहीं तर मृत्युलोक सोडावयाचा. ह्मणूनच त्या दुष्ट क्रूरसेनापासून आपली सुटका करून घेतली. आणि परमेश्वराची ही मजवर पूर्ण दया आहे, हें खचित. कारण, त्याच्या प्रसादानंच हे चरण मजला अनायासें व सत्वर दृष्टीस पडले. नाहीं तर माझी काय दशा

झाली असती याची कल्पनासुद्धां करवत नाहीं. आ-तां आपल्याला कदाचित शंका येईल कीं, माझे ब-हिणीची आणि तुमचे ( मदन ) बहिणीची गांठ क-शी व कुठें पडली; तर तेंही सांगत्यें. आपल्या स्व-रूपाचा व त्या तसबिरीचा सारखेपणा वाटल्यावरून माझा तर्क खरा झाला. आपली बहीण व माझी बहीण ह्या सख्या जावा आहेत. त्यामुळं ती तसबीर माझे दासीला मिळाली. तीही माझे जवळ आहेच. आ-पण अवलोकन करावी. ( असें ह्मणून तिनें आपल्या जवळची तसबीर दाखविली.) हे सौंदर्यसागरा, आतां या दासीचं पाणिग्रहण करणें आपणांस उचित आहे. प्राणेश्वरा, आपली ही सुंदर काया अवलोकन केल्या-पासून माझं मन ठिकाणावर नाहीं. तर हे रतिवरा, म-ला वचन मिळावं ह्मणजे मी कृतार्थ होईन.

असें तिचें मधुर भाषण श्रवण करून राजपुत्रही आनंदी झाला. बरोबर आहे. चांपेकळीसारखें तर-तरी नाक, धनुष्याकार भृकुट्या, नेमस्तभाळ, पक्व तों-डल्याप्रमाणें लाल ओष्ठ, डाळिंबाच्या बियांसारखे शुभ्र व तेजस्वी दंत, गुलगुलीत गल्ल, गुटगुटीत रत्न-कलशाकार स्तन, गोंडस हस्त, कर्दळी स्तंभाकृति जघन, मंजुल, सुकुमार आणि आरक्त पावलें, व मधुर भाषण मग काय, एक कां दोन सर्वच उत्कृष्ट! अश्या सुंदर रमणीस पाहून तो मोहीत कां होणार नाहीं!(आणि मनांत आपणाशींच आपल्या एकेक अवयाला उद्देशून ह्मणतो. ) गड्यांनो, थोडा वेळ स्वस्थ असा. नेत्रांनों,

तुमची इच्छा सफळ झाली. कारण तुमचा कार्यभाग फक्त अवलोकनप्रकार. तर तो तुह्मी सूक्ष्म रीतीनें आणि पूर्णपणें केला. परंतु ही प्रत्यक्ष रति मला वरण्याकरितां भूलोकीं अवतीर्ण झाली असल्यामुळें तुमची अवलोकन तृप्ति होत नाहीं; नाहींच होणार. अधरांनों, तुह्मी त्या सुकुमार आणि लाल अशा सुंदर गालांचें चुंबनामृत प्राशन करण्याची उत्कंठा करीत आहांत. परंतु कांहीं काळ स्थिर असा. हस्तांनों, तुह्मी सुवर्ण कलशाप्रमाणें असे उच्च वक्षस्थळावरील पुष्ट स्तनास घट्ट संघट्टनास उत्सुक व अलिंगनास तत्पर झालांत; परंतु एकाएकीं अस्थिर होऊन आपली मर्यादा सोडूं नका. आपला अज्ञानपणा दाखवूं नका. थोडक्याच काळांत तुमच्या संपूर्णांच्या इच्छा पूर्ण होतील. आणखी आपण एकदम हिचा अंगिकार केला तर आपल्या कुलीनपणास बाध येईल. ही कशा प्रकारची स्त्री आहे, हें तर आपल्यास पूर्णपणें समजलें आहे. व आपल्यावर हिचें प्रेम कसें पूर्ण आहे हें ही तसबीर साक्ष देत आहे. तेव्हां इचा अंगिकार केला असतां आपण कुलास हीनत्व आणण्यास कारण होणार नाहीं ? अरे काय ह्मटलें हीनत्व ? छे ! यापासून उलटी कुलास शोभा येणार आहे. आज माझें प्रारब्ध उदयास आलें; ह्मणून असलें सुंदर स्त्रीरत्न अनायासें माझें स्वाधीन झालें तर असल्यास नाहीं कोण ह्मणेल? असो.(उघड) हे कोमलांगे सुकुमारे, तुझीं भाषणें श्रवण करून हर्ष तर झालाच; व तूं जी विनंति केलीस, ती म्हणजे मी

अमान्य करावी असा माझा हेतु नाहीं. अशी चतुर स्त्री इजला कोण चतुर नाहीं म्हणणार आहे? कारण, योग्य ठिकाणीं योग्य उपयोग होत असतो. सिंहावांचून सिंहाची कन्या कोण वरणार आहे ?

परंतु हे सुंदरी, ह्या ब्रह्मसूत्राच्या ग्रंथी ह्या केवळ आपल्या ह्मणण्यानें बांधल्या जातील ! असें मला वाटत नाहीं. ईश्वरी संकेत जसा असेल,तसें घडून येईल. मीं कोणतेंही कृत्य रूपसुंदराच्या अभिप्रायावांचून करीत नसतों; व अद्यापपावेतों केलेंही नाहीं. याजकरितां या महत्कृत्यास त्याचा विचार घेतल्याखेरीज माझ्यानें अभय देववत नाहीं.

पु०—हे मम हृदयानंदवर्धका, आपल्या सांप्रतच्या कामास दुसऱ्याच्या विचाराची गरज नाहीं. कारण ही ज्याच्या त्याच्या मनाप्रमाणें गोष्ट घडण्याची असते. यांत दुसरा आपला विचार काय सांगेल! ह्या परस्परांच्या जन्माच्या गांठीं ! एकमेकांस आवडलें म्हणजे घडून येण्यास कांहीं हरकत नाहीं.

म०—सुंदरी, गोष्ट सत्य आहे. परंतु तो माझ्या मनाबाहेर नाहीं. आम्ही दिसण्यांत मात्र दोन, परंतु अंतःकरण एकच आहे. तेव्हां माझा जो विचार तोच त्याचा. पण तो त्या मुखांतून वदवला पाहिजे इतकेंच.

पु०—प्रिया, हें जरी खरं आहे. तरी बाई जी गोष्ट स्वतःवर अवलंबून असते, ती करणं किंवा न करणं हें दुसऱ्याच्यानं कसं सांगवेल ?

म०—सौंदर्यलतिके, मीं आतांच सांगितलेंना कीं

अंतःकरणें एकच आहेत. तेव्हां त्यांतून अन्य विचार निघावयाचेच नाहींत.

पु०--प्राणेश्वरा, (हंसत) कोण बाई ह्मणेल कीं, अमुक बायको कर किंवा करूं नको ?

म०--सुकुमारे, हो, असेंही ह्मणूं शकेल ! कारण जर एखादी कृत्या असून तिची माहिती त्यास असली, तर ती करूं नको असें नाहीं कां ह्मणणार ?

पु०--प्रिया, ( धिःकारून ) इश्शगबाई, मग जन्मास न यावं तें बरं. असो. पण प्राणनाथ, माझ्या विनंतीचं एकीकडेसच राहिलं. मी आतां मोकळं मन करून स्पष्ट सांगतें कीं, मी हे चरण तर वरिलेच व माझा मानसिक विवाह लागला, परंतु आपलं वचन मिळण्याचीच काय ती आशा राहिली आहे. तेवढी सफळ झाली ह्मणजे मग माझ्यासारखी भाग्यवान कोण आहे ! फार काय सांगूं ! येथेंही अन्य कोणी नाहीं. ( लाजून ) बाई मला असं झालं आहे कीं, केव्हां या शरिराला घट्ट आलिंगन देईन.

म०—हो,हो, प्रिये,इतकी आतुर होऊं नको. दोन्हीकडील विचार सारखेच जमले; तेव्हां बहुतकरून त्वरितच असा प्रसंग घडेल.

याप्रमाणें त्यांचा विनोदी संवाद चालला आहे व प्रस्तुत झालेल्या भाषणाच्या रोंखावरून पुष्पावतीस पुष्कळ धीर आला आहे. इतक्यांत रूप सुंदर येऊन पोहोंचला. तेव्हां भोजनास विलंब होईल याबद्दल या उभयतांसही मुळींच कांहीं वाटलें नाहीं. बरोबरच

आहे. प्रियवस्तूपुढें सर्व तुच्छ असते. त्यांतही जी प्रिय गोष्ट तिच्याबद्दल जास्त सांगणेंच नको. याचा अनुभव प्रत्येक वाचकास थोडाबहुत आहेच. त्या उभयतांनीं लागलीच आपली हकीकत रूपसुंदरास कथन केली. तें श्रवण करून रूपसुंदर फार संतुष्ट झाला. त्यानें हें पूर्वीं धर्मशाळेंतच जाणलें होतें कीं, हा राधाकृष्णाचा संयोग जमण्याचा समय ईश्वरकृपेनें आयता आला आहे. तेव्हां मी नाहीं ह्मणणार कोण ! असें माझ्यांत काय सामर्थ्य आहे ! जी गोष्ट घडविणें परमेश्वराच्या मनांत आलें, ती माझ्या नाहीं ह्मणण्यान राहणार आहे ? मजला उभयतांचे विचार फार मान्य झाले. व तुह्मी दोघांनींही मजला नम्रतेनें व मित्रत्वाच्या नात्यानें आपलें हृद्गत सांगून माझी संमति घेतली ही गोष्ट फार सुरेख केली. असो, आतां तुह्मा उभयतांसही मी संतोषानें सांगतों कीं, तुह्मी उभयतांनीं परस्परांच्या प्रीतींत अंतर करूं नये. पूर्ण प्रेमानें सुखी रहावें. आणि दयाळू भगवानानें तुह्मांस दीर्घायु करावें. अशी माझी पूर्ण इच्छा आहे. याप्रमाण त्या तल्लीन झालेल्या उतावीळ आपुकमापुकांचें ऐक्य करून ते भोजनविधी सारिते झाले.

---

## भाग तिसरा.

—०:-०:-०—

ते वसंतऋतूचे दिवस असल्यामुळें जंगलांत जिकडे

तिकडे वृक्षांना नवीन पालवी फुटली आहे, आम्रवृक्षांना मोहर आलेला आहे, नानातऱ्हेचे वृक्ष व लता हिरव्यागार दिसत आहेत, कांहींच्या सुशोभित रंगीबेरंगी पुष्पांचा परिमळ सर्व वनांत पसरला आहे,त्यामुळें तें वन कसें एखाद्या विहारी उद्यानाप्रमाणें दिसत आहे,थंड फळांचे मळे लोक तयार करीत आहेत. कोणी त्यांस पाणी देत आहे, कोणी आपल्या मळ्यांतील सुवासिक पुष्पें व मधुर फळें काढून विक्रयाकरितां नगरांत नेत आहेत. असा समय झाला असतां त्यांचें मन त्या थंड हवेंत प्रयाण करण्याविषयीं उत्सुक झालें.

आतां मदनबाण व पुष्पावती हीं सौख्य पर्वताच्या शिखरावर पोहोंचल्या प्रमाणें झालीं. तीं सुखानुभव घेण्यास फार उतावीळ होऊन त्यांचें सर्व लक्ष्य पुढील सुखांत गर्क झालें. त्यामुळें त्यांस दुसरें कांहीं सुचेना. परंतु क्रीडावती नगरांत जाऊन विधियुक्त शास्त्र मार्गानें पाणिग्रहण झाल्यावांचून पूर्ण सुख अनुभवायाचें नाहीं. असा निर्बंध असल्यामुळें तीं अंमळ खिन्न झाली व क्रीडावतीस जाण्याची घाई करूं लागली. त्यांनीं रूपसुंदरास जरी निघण्याविषयींचा आपला बेत कळविला. तो मुळचाच चतुर त्यानें त्यांचे मनोगत जाणून लागलीच प्रयाणाची तयारी केली. परंतु जवळ उपहाराकरितां कांहीं नसोन घोड्यासही दाणा नव्हता. रूपसुंदरानें दुपारचें पुरतेंच साहित्य आणलें होतें. त्याच्या मनांत असें आलें होतें कीं ब-

हुत करून आतां लौकर निवणें होणार नाहीं. पण ही निवण्याची तयारी झाल्यावरून, त्यानें राजपुत्रास विनंती केली कीं,

रू०—महाराज,आपण अस्ते अस्ते चालूं लागावें, मी इतक्यांत शहरांत जाऊन कांहीं अल्पाहाराकरितां फळफळावळ, मेवामिठाई आणि अश्वांना चंदी घेऊन येतों.

तेव्हां उभयतांनीं रूपसुंरास लौकर येण्याचें सांगून आपण आनंदांत विनोदी भाषणें करीत चालूं लागले. **रूपसुंदर** हा शहराकडे निघाला. इकडे काय चमत्कार झालेला आहे कीं, बारावर चार वाजण्याची वेळ असल्यामुळें, विलासी जन हवा खाण्यास बाहेर निघाले आहेत, त्याचप्रमाणें राजकन्या आदिकरून प्रधानसुता आपल्या मैत्रिणीं समवेत उपवन क्रीडेस आपल्या रमणीय बागेंत आल्या आहेत, उद्यानांतील चमत्कारिक पुष्पांचे रंग, सुगंध व सहस्त्र धारांचें कारंजें यांची शोभा पाहून आनंदीत झाल्या आहेत, अशा समयास **रूपसुंदर** हा घोड्यावर बसून नगरांत चाललेला प्रधानकन्येच्या दृष्टीस पडला. ( त्याच बागेवरून नगरांत जाण्याचा मार्ग होता. ) तेव्हां त्याची ती मनोहर दिव्य मूर्ति पाहून ती कामानें व्याप्तहोत्साती मूर्छित पडली. त्यासमयीं दासींनीं तिच्या नेत्रांना पाणी लावून तिजला सावध केलें. आणि लागलीच त्या तिजला वरीं घेऊन गेल्या–व झालेली हकीकत तिच्या मातोश्रीस सांगितली. तेव्हां ती घाबऱ्या घाबऱ्या

कन्येकडे आली, आणि तिजला विचारूं लागली.

क०—बेटा चंपकमालते, तुला काय झालें तें सांग. बये असें करूं नको.

ती स्मरबाणाच्या तीक्ष्ण प्रहारांनीं व्यथित झाली असल्यामुळें तिजला कांहींच सुचेना, व लज्जेस्तव तिच्यानें आपले मनेप्सीत हेतु आपल्या प्रिय मातेस सांगवतना. ती तळमळ तळमळ करीत आहे हें पाहून त्या आईस फारच दुःख होऊं लागलें. तेव्हां तिच्या प्रीतींतील अरुणिका दासीनें कमलनयनेस सांगितलें कीं, बाईसाहेब एक तरुण सुरेख देखणा भूषणांनीं अलंकृत असा मुशाफर घोड्यावर बसून चालला होता; त्यास पाहिल्यापासून धाकट्या बाईसाहेबांची अशी अवस्था झाली. तेव्हां कमलनयनी ह्मणाली, बाळे चंपकमालते, असाध्य वस्तु साध्य करण्याची आशा बाळगणं ह्मणजे विनाकारण शरिराला दुःख देणं आहे. याजकरितां ज्या वस्तूची आपणास माहितीच नाहीं, व ती प्राप्त होईल किंवा नाहीं याचीही शंका असोन, कदाचित प्राप्त होईल, असंही मानलं तरी दुर्घटच. तशा वस्तूवर कधींही प्रीति करूं नये. व वेड्यासारखं नादीं भरून असल्या नाजुक देहाला क्लेश देऊं नयेत. तूं कांहीं चिंता करूं नको; तूं उपवर झाली आहेस, हें आह्मांलाही कळत असोन, ते तुला पती पाहण्याच्या शोधांत आहेत. असा सुंदर तुझ्या रूपाला योग्य व चांगला कुलीन

हुशार पुत्र पाहून, तुझं लौकरच लग्न करूं. तूं अशी बावरी होऊं नको.

याप्रमाणें अनेक प्रकारांनीं **कमलनयनेनें** तिची समजूत केली. परंतु तिनें मुखांतून एक अक्षरसुद्धां काढिलें नाहीं. तिच्या अंतःकरणांत ती मनमोहन मूर्ति भरली असल्यामुळें तिला कांहींच रुचलें नाहीं. नंतर **कमलनयना** कन्येस तिच्या महालांतील मंचकावर निजवून आपण निघून गेली.

तेव्हां तिच्या प्रीतींतील दासी तिजला म्हणते.

अ०—काय बाईसाहेब, शंकरांनीं त्या मदनास भस्म केला आहे, तरी त्याचा काय हा सपाटा विलक्षण ! आणि आपलंही खरंच, तो पुरुष तसाच प्रीति करण्यास योग्य होता. मग कां तो कोणी गंधर्व होता, किंवा कोणी देव, रूप पालटून या लोकीं आलेला आहे; काय असेल तें एक भगवानच जाणे. असो. पण बाईसाहेब, आईसाहेबानीं जें सांगितलं, तें कांहीं खोटं नाहीं. त्याजवर तुह्मी विनाकारण प्रीति करूं नका. व या कोमल शरिराला कष्ट देऊं नका. आईसाहेबानीं सांगितल्याप्रमाणें आह्मी थोडक्याच दिवसांत आपल्याला सुंदर पतीसमवेत क्रीडा करतांना पाहूं.

हें दासीचें भाषण ऐकल्याबरोबर ती रागानें लाल झाली, व नेत्र वटारून ह्मणते.

चं०—**अरुणिके,** फार बोलूं नको. मी कांहीं व्यभिचारिणी स्त्री नाहीं. ज्या चरणीं एकदां मन

तल्लीन झालं, त्या चरणावांचून आतां अन्यत्र कधींही जावयाचं नाहीं. एकापेक्षां जास्तावर प्रीति करणाऱ्या स्त्रिया जारिणी होत. समजलीस, मी तुला शेवटचंच सांगतें कीं, त्या चरणावांचून जगतांतील वडील पुरुष पित्याप्रमाणं व बरोबरीचे आणि लहान भावाप्रमाणं हा माझा पूर्ण निर्धार झाला. अहाहा! काय तें सुंदर मुखकमळ!! काय ती घोड्यावर बसण्याची ऐट, ती मनोहर मूर्ति जशीच्या तशीच माझ्या दृष्टी पुढें दिसत आहे.

हें तिचें निर्वाणीचें बोलणें ऐकून दाशी ह्मणते—

अ०—बाईसाहेब जर त्यांचा शोध लागला नाहीं आणि कदाचित शोध लागून ते जर नीच कुलांतले असले, तर मग कस करावं?

चं०—( रागानें ) अरुणिके तुझ्या जिभेला हाड आहे वाटतं. अग तुला लाज कशी वाटत नाहीं? असलं नररत्न अन्यत्र कसं निर्माण होईल! मौक्तिक सागरावांचून हलक्या डबक्यांत उत्पन्न होईल काय! त्या मनमोहनानं वीरमातेस जगांत धन्य केलं असावं; यांत संशय नाहीं.

असा तिचा दृढनिश्चयाचा संकल्प पाहून अरुणिकेनें तें इत्थंभूत वर्तमान कमलनयनेस निवेदन केलें. तेणेंकरून तिजला मोठें आश्चर्य वाटलें; व दुःखही झालें. कारटीचें धाडस किती कठिण ह्मणून आश्चर्य, ! आणि पुढील व्यवस्था होणार कशी ह्मणून फार दुःख झालें,

नंतर ती लागलीच आपल्या पतीकडे गेली. तेजपाळ प्रधान कांहीं खाजगी मंडळी सहवर्तमान गोष्टी बोलत बसला होता. तेव्हां **कमलनयना** महालाच्या दरवाजाच्या अडून म्हणते—

**क०**—( दुःखाने ) आज दुःखाचा पर्वत कोसळल्या सारखं झालं ह्मटलं तरी चालेल. तरी मी इतके दिवस ह्मणते आहे कीं, मुलगी उपवर झाली, तिच्या लग्नाची तजवीज करा. परंतु इकडं कुठं त्याचं कांहीं वाटत आहे. अहो आह्मी स्त्रिया, आमचीं दुःखं आह्मांस ठाऊक ! ज्या वेळचं त्या वेळेला होऊन जिकडं तिकडं मनुष्य गेलं ह्मणजे बरं. आतां “ ध्या हिसके आणि तोंडा दावीं ! ” कन्येचा प्रताप ऐकलांत कां !

**ते०**—( घाबरून ) काय झाळे तरी काय? इकडे ये. येथें कोणी परकी नाहीं. कांहीं अन्य विचार होऊन कुलाला कलंक लागला वाटतें ? असें संदिग्ध भाषण करून मला दुःख सागरांत लोटूं नको ! काय असेल तें स्पष्ट सांग.

त्यावरून तिनें कन्येची संपूर्ण हकीकत सांगितली. तेव्हां **तेजपाळ** अमळ शांत होऊन ह्मणाला अंः एवढेंचना? असो, मग कांहीं चिंता नाहीं. असें ह्मणून **चंपकमालती**च्या महलांत गेला. व तिजला पुष्कळ प्रकारांनीं उपदेश केला, हिताच्या गोष्टी सांगितल्या, दुराग्रहाचा परिणाम भयंकर होतो, छांदिष्टपणा उपयोगी नाहीं. परंतु तिचा दृढ निश्चय यत्किंतही ढळ-

ला नाहीं. तेव्हां निरुपायास्तव व अत्यंत प्रियकर कन्या यामुळें मुशाफर कोण, कोठें आहे, याच्या तपासास तेजपाळ प्रधान निघून गेला.

आतां इकडे काय प्रकार झाला कीं, प्रधानपुत्र रूपसुंदर हा शहराचे वेशींत जों येतो आहे तों, जिकडे तिकडे, धरा, मारा, पाडा,एकीकडे व्हा, रस्त्यांत कोणी उभें राहूं नका. असा एकच गोंगाट होऊन दुकानदारांनीं आपापलीं दुकानें बंद केलीं आहेत, नागरिकजन आपापल्या खिडकींत, सज्जांवर, गच्चांवर मौज पहात उभे आहेत; आणि आला, संभाळा, असा गोंधळ करीत आहेत. रस्त्यांत मुळींच मनुष्य नाहीं, तेव्हां हा काय चमत्कार आहे, याचा रूपसुंदरास मोठा अचंबा वाटला. हे लोक असें कां करितात, याचें कारण कळेना. कोणास विचारावें तर मार्गावर कोणीही नसून, वरील मनुष्यें आपल्याच नादांत असल्यामुळें, त्याच्या भाषणाकडे कोणी लक्ष्य देईना. इतक्यांत एक मदोन्मत्त हत्ती मस्तकावर शुंडाग्रानें धूळ घालीत, प्रचंड शुंडा चक्राकार फिरवीत,भूपृष्ठावर थडाथड आपटीत, पायांखालीं जें सांपडेल तें तुडवीत आपल्याकडेसच येत आहे. मागें हजारों लोक दुरूनच आला, संभाळा एकीकडे व्हा, असें ह्मणत लांब लांब पळत आहेत; परंतु एकही त्याचा पाडाव करण्याचा प्रयत्न करीत नाहीं; असें रूपसुंदरानें पाहिलें. तेव्हां त्यास चमत्कारिक प्रकारचें नवल वाटलें. तेव्हां त्यानें असा विचार केला कीं, आपण अचुक निशाण व उंच

स्थळावर नेमकें उड्डाण मारणें ह्या विद्येंत प्रवीण झालों आहोंत; तिची परीक्षा पाहण्याची ही उत्कृष्ट संधी आलेली आहे. असें ह्मणतो आहे तोंच, तो मस्त झालेला गज शुंडा फिरवीत जवळ येऊन ठेपला. तेव्हां लागलेंच रूपसुंदरानें किंचितही न भितां जोडगोळी घालून त्यास लंगडें केलें. आणि अचुक घोड्यावरून हत्तीचे मस्तकावर उडी टाकिली. व त्यास आपल्या जवळच्या भाल्यानें टोंचून टोंचून इतकें जर्जर केलें कीं तो एवढा खवळलेला हत्ती पण चीं चीं करीत मागें सरला; व गरीब मेंढ्या सारखा मऊ आला. हें रूपसुंदराचें विलक्षण धैर्य, शौर्य आणि साहास पाहून जनसमुदायानें मुखांत बोटें घातलीं; आणि धन्य धन्य असा एकच जयघोष केला. व त्याजवर पुष्पांची वृष्टि केली. त्या वेळेस रूपसुंदरास कसें वाटलें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. ही हकीकत सर्व नगरांत पसरली, व राजास ही कळली कीं, इतका मस्त झालेला प्रचंड हत्ती ज्यास धरण्याची कोणाची छाती होईना, त्यास एका तरूण वीस वर्षाच्या मुशाफरानें धरिलें. व राजवाड्याकडेसच त्यास घेऊन येत आहे. तेव्हां राजास ही मोठें आश्चर्य वाटलें कीं, धन्य त्याची माता अशा वीरपुत्रास प्रसवून त्रैलोक्यांत कीर्तिते पावली. तो रूपसुंदर येऊन पोहोंचला. त्यानें लागलीच हत्तीवरून उडीमारून नम्रतेनें राजास त्रीवार मुजरा केला. आणि हस्त जोडून विनंति केली कीं, याचा बंदोबस्त करावा, मी

रजा घेतों. तिकडे माझा घोडा वेशीपाशीं एकटाच उभा आहे. हे शब्द ऐकतांच, व त्याचा तो भव्य चेहरा अवलोकन करताच आणि ती मर्यादी वागणूक पाहतांच, राजास बहुत विस्मय वाटला. त्यास असें वाटलें कीं, हा कोणी तरी राजपुत्र असावा, इतराच्या हातून असा सदाचार कधीं ही घडावयाचा नाहीं. तेव्हां अशा सत्पुत्राचा आपण अनादर करणें ह्मणजे देशांतरीं दुष्कीर्ति घालविणें होय. तेव्हां चंद्रसेनराजानें स्वतः खालीं येऊन त्यास सांगितलें; महाराज, आपले चरण आमच्या वाड्याला कशानें लागणार ! तर अनायासा आलेला समय व्यर्थ घालविणें ह्मणजे आपला मूर्खपणा व कृतघ्नपणा जगाला महशूर करणें होय. त्यांत आपले महत्‌उपकार! तेव्हां आपण क्षणैक थांबून, कोण कोणत्या कुळाला शोभिवलें; वास्तव्य कोठें? गमन कोणीकडे होत आहे, हें कळल्यावांचून चित्ताची स्वस्थता होणार नाहीं. आपण घोड्याविषयीं अगदीं काळजी करूं नये; त्याची योग्य व्यवस्था लागेल. असें ह्मणून त्यास हस्ताला धरून वाड्यांतील दरबारच्या दिवाणखान्यांत नेलें. तेथें योग्य सत्कार होऊन विडे, हार, तुरे, अत्तर, गुलाब झाल्यावर चंद्रसेन राजानें पूर्वींची विज्ञप्ती केली. तेव्हां रूपसुंदर ह्मणाला, सरकार, मी गरीब आपला दास आहे. आपण मजला विनंति करण्याचा अधिकार नाहीं. मी प्रधानपुत्र आहे. मग त्यानें आपलें साकल्य वर्तमान राजास कथन केलें. हें आपण चा-

ळें आहे तों तेजपाळ प्रधानास मुशाफर नुकतांच वाड्यांत गेल्याची बातमी लागल्यावरून तो तेथें येऊन दाखल झाला. त्यांस हत्तीचें वगैरे प्रकरण कांहींच माहित नव्हतें. कारण शहर मोठें, व प्रधानाची प्रकृति थोडीशी अस्वस्थ असल्यामुळें तो दोन तीन दिवस दरबारांत मुळींच गेला नव्हता. त्याचा पुत्र धैर्यानंद राजसेवेंत तत्पर होता. रीतीप्रमाणें मुजरे होऊन आदरातिथ्य झाल्यावर तेजपाळानें आपल्या कन्येचा मजकूर राजास मोठ्या खुबीनें व लीनपणानें विदीत केला. व मनांत म्हणतो, कन्येचें परीक्षण योग्य आहे. हा नरपंचानन पराक्रमानें व रूपानें खरोखरच फारच योग्य आहे.

नंतर चंद्रसेन राजानें प्रधान तर्फे रूपसुंदरास विनंति केली कीं, प्रधानजीच्या सांगण्याप्रमाणें जर प्रकार घडलेला आहे, तर आपण आमच्या प्रधानजीला रुकार देऊन, त्यांच्या दुहितेचा अंगिकार केला पाहिजे. अनमानि करण्याचें आतां कारणच उरलें नाहीं. आपणांस कोणत्याही प्रकारें संशय बाळगण्याचें प्रयोजन नाहीं. प्रधानसुता आपल्या स्वरूपाला व गुणाला योग्यच आहे. आपण प्रत्यक्ष दृष्टीनें पाहिलें ह्मणजे कळेल. आणखी आतां " करींच्या कंकणाला दर्पण नको," " हा सूर्य आणि हा जयद्रथ" पाहिजे असल्यास आणवितो. हें राजाचें भाषण ऐकून व प्रधानकन्येचा निर्धार पाहून, रूपसुंदरास मोठें कोडेंच पडल्यासारखें झालें. कारण आ-

पल्या मित्रानें असा प्रसंग आपल्या विचारा शिवीय घडवून आणला नाहीं. मग आपण त्याच्या अनुमता खेरीज कसें वचनांत बद्ध व्हावें. तेव्हां **रूपसुंदरानें** आपला परमप्रिय स्नेही व धनी जो राजपुत्र **मदन-बाण** त्याचें एकंदर वृत्त कथन केलें. आणि राजास कर जोडून प्रार्थना केली कीं, ते माझे धनी आल्या-खेरीज कोणत्याही प्रकारचें अनुमोदन मला देतां येत नाहीं. तों लागलेंच **चंद्रसेन**राजानें पंचवीस हुशार स्वार त्यांच्या शोधास **रूपसुंदराची** खूण देऊन पा-ठविले. ते स्वार सांगितलेल्या ठिकाणापासून तपास करीत चालले आहेत; परंतु राजपुत्र **मदनबाण** व राजकन्या **पुष्पावती** यांचा कांहींच थांग लागेना. पुढें तसाच बारीक रीतीनें तपास करीत चालले.

येथें काय प्रकार झाला आहे, राजपुत्र व राज-कन्या हीं उभयतां आनंदांत पुढील भावी सुखाच्या गोष्टी बोलत चालले असतां राजपुत्रास शौचास जा-ण्याचा प्रसंग आला. त्यामुळें त्यानें **पुष्पावतीस** तेथेंच वृक्षाखालीं बसवून आपण दूर एकांतांत निघून गेला. पादप्रक्षालन करून जों निघतो आहे तों, तेथें जवळच एका जाळींत व्याघ्र होता; त्यानें गर्जना केली. ती त्याची डुरकणी श्रवण करतांच राजपु-त्रास किमपीही भीति न वाटतां उलटा आनंद झाला. कारण त्यास शिकारीचा नाद फारच असे. व बहुत दिवसांत मृगया नसल्यामुळें तो बेलाशक व्याघ्राच्या जाळीजवळ गेला. आणि बार काढून त्यास बाहेर

बोलाविलें. तेव्हां तो व्याघ्र चवताळून, तोंडाचा ज-बडा पसरून, त्यास भक्षण्याकरितां धांवून आला. परंतु राजपुत्रानें किंचितही न डगमगतां व जाग्याव-रून न हालतां मोठ्या शौर्यानें गोळी घालून त्यास घायाळ केलें. व्याघ्र तसाच लंगडत चाल करून येऊं लागला, परंतु **मदनबाणानें** तात्काळ दुसरी गोळी घालून त्यास ठार केलें. तों काय चमत्कार झाला कीं, व्याघ्र नाहींसा होऊन त्याठिकाणीं एक दिव्य पुरुष उत्पन्न झाला. आणि **मदनबाणास** वंदन करून, तो पुरुष जाण्याविषयीं आज्ञा मागूं ला-गला. हें पाहून **मदनबाणास** फारच नवल वाटलें. व थोडेसें भयही उत्पन्न झालें. तेव्हां हा काय च-मत्कार आहे, हें या पुरुषास विचारल्यावांचून क-ळणार नाहीं; असें जाणून—

म०—महाराज, आपण कोण? व्याघ्ररूप क-शाकरितां घेतलें होतें! हें कृपाकरून सांगाल, तर दासावर बहुत उपकार होतील.

पु०—हे शौर्यसागरा, राजचुडामणे मी यक्ष हो-य. मी आपल्या स्वामीच्या कार्यांत एके समयीं दुर्ल-क्ष्य केल्यामुळें, स्वामीनीं कोपायमान होत्साता मला शाप दिला कीं, तूं दुष्ट व्याघ्र होशील. मग त्यां उ-श्शाप मागितला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, क्री-डावती नगरीचा **मदनबाण** राजपुत्र अरण्यांत येईल, त्या वेळेस तूं त्यास मारण्याकरितां गेला असतां, तो तुझा नाश करील. मग तुजला तुझा पूर्व देह प्रसा

होऊन या स्थानीं सेवेला येईल. त्याप्रमाणें माझें कार्य झालेलें आहे. महाराज, आपले उपकार मजवर फार झाले आहेत. मी या व्याप्त देहास फार कंटाळलों होतों. परंतु आपल्या कृपाकटाक्षानें त्यांतून मुक्त झालों. आतां मी आपला उतराई काय होऊं. ही एक कांडी आपणास देतों, इचा गुण असा आहे कीं, इजला धूप दीप दाखविला असतां इजपासून अगणित द्रव्य प्राप्त होईल. आतां मी स्वामी दर्शना करितां जातों, आज्ञा असावी.

म०— फार उत्तम आहे. गमन करावें. दासावर अनुग्रह असावा. मी ही आपल्या मार्गाला लागतो.

असें ह्मणून उभयतां मार्ग क्रमण करूं लागले. कांहीं वेळानें यक्ष दिसेनासा झाला. तेव्हां **मदनबाण** आपला मार्ग शोधूं लागला, इतका वेळपर्यंत तो आश्चर्यनंदानें त्या यक्षाकडेसच पाहत होता. त्यास हा विलक्षण प्रकार पाहून कांहीं सुचेनासें झालें. तो अशा स्थितींत आपला मार्ग चुकून अरण्यांत शिरला. पुढें जातों तों मार्ग नाहीं. घोडा चालेना. तेव्हां तो शुद्धीवर येऊन पाहतो तों आपण एक भयंकर अरण्यांत आलों आहोंत. रात्रही बरीच होऊन अंधःकार पडला होता. प्रिया कोणीकडे राहिली, आपण कोणत्या मार्गानें आलों, हें कांहींच त्यास कळेना. तेव्हां तो मोठ्या विचारांत पडला. इकडे **पुष्पावतीनें** बहुत वेळ राजपुत्राची वाट पाहिली; परंतु येत नाहीं असें पाहून, शोध करूं लागली. तिला असें भय प्राप्त

झालें कीं, इतका वेळ झाला, अजून येणं होत नाहीं. तेव्हां आहे तरी काय ? शरिरानं बरे असोत ह्मणजे झालं ! ! तपास करितां कांहींच पत्ता लागत नाहीं. असें पाहून ती घाबरली. व आतां कसं करावं, अशा घोर चिंतेत पडली.तपास करीत आहे तों एकदम आड रस्त्यानें पन्नास पाऊणशें हत्यारबंद काळेकुट्ट, भले दांडगे लोक येत आहेत, असें तिनें पाहिलें. मग तर पुष्पावतीची अवस्था कशी झाली असेल, तें कथन करणें ह्मणजे, अंगावर शहारे आणणें आहे. आधींच काळोख त्यांत एका संकटांतून मुक्त होऊन जों सुखाच्या मार्गाला लागत होतें, तों परमेश्वरानें हें भयंकर संकट आणलें. भयानें तिच्या आंगाला कांपरे सुटलें, दरदरून घाम आला आणि दांतखिळी बसली. परंतु दैवगति कांहीं विचित्र ! पुष्पावतीनं मुशाफराचाच पोषाख केलेला होता. व घोडा चरण्यास सोडून देऊन ती वृक्षाखालीं बसलेली होती. व अंधकार फार त्यामुळें पुढें परिणाम सुखकर झाला. ते तस्कर जवळ येऊन पाहतात तों, कोणाचें गरीब पोर लोळत पडलेलें त्यांचें नजरेस पडलें. तेव्हां या भिकाऱ्याजवळ काय असावयाचें आहे ? असें जाणून ते तसेच आपल्या मार्गानें चालते झाले. सावध झाल्यावर पुष्पावतीनें करुणस्वरानें भगवंताचें स्तवन करून फार फार आभारी झाली. आणि हे दीनवत्सल प्रभो, जसं तूं या संकटातून मला सोडविलं; तसंच माझे प्राणेश्वर मला भेटीव. तुझेंच कृपेनं सर्व ब्रह्मांडानं

काम चाललं आहे. तर प्रभो, तुझ्या कृपेनं काय एक होणार नाहीं ? तूं प्रसन्न झाला असतां क्षणांत राजाला रंक आणि रंकाला राजपदीं स्थापिशील; दुःखिताला सुखी आणि सुखी मनुष्यास दुःखी करण्याचं तुझें स्वाधीन आहे. फार काय, ईश्वरा तुझ्या आज्ञेवांचून वृक्षाचं पानसुद्धां हलूं शकणार नाहीं. तर हे कृपाघना, या वेळेस मज दीन दासीवर दया करून माझा प्राण जो **मदनबाण** याची माझी भेट कर. देवा म्यां अज्ञान दासींनं तुझी स्तुति किती करावयाची आहे ? सहस्त्रमुखी शेषही तुझे गुणाचं वर्णन करण्यास समर्थ नाहीं. तेथें मी मंदमती एकमुखी दीन दासी किती स्तवनाला योग्य होणार आहे?

असें परमेश्वराचें स्तवन करीत त्या अंधःकारांत अरण्यांतून इकडून तिकडे भटकत आहे; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां तिनें विचार केला कीं, आतां या घोर वनांत भ्रमण करण्यापासून एखादें नवेंच संकट उद्भवून शरीरास व जिवास त्रास होणार आहे; याजकरितां रात्र कशी तरी दुःखांत काढण्याचा प्रसंग आपल्या दुर्दैवानं आला खरा ! तरी आतां नगरांत जाऊन भावोजींची गांठ पडल्यास त्यांना ही हकीकत सांगावी. आणि ते व आपण मिळून प्राणनाथांचा शोध करावा.

असें ह्मणून नगराचा मार्ग शोधूं लागली. नंतर कांहीं वेळानें मोठ्या कष्टानें ती रात्रीची धर्मशाळेंत

येऊन पोहोंचली. ज्या धर्मशाळेंत काळच्या दिवशीं नानाप्रकारच्या सुखदुःखाच्या गोष्टी एकमेकांनीं परस्परांस सांगून एकमेकांचें शांतवन केलें, व जी ध्यानस्त मूर्ति दृष्टीस पुढें होती, तेथें आज तिजला सर्व शून्य दिसूं लागलें. तिजला चैन पडेना. मनांत अनेक प्रकारचे तरंग येऊं लागले. ती आपल्याच मनाशीं ह्मणूं लागली, परमेश्वरा मी तुझा असा काय अपराध केला ह्मणून माझा आणि माझ्या प्राणप्रियाचा इतक्या अल्पकाळांतच वियोग केलास! देवा अझून तर मजला प्राणनाथापासून सुख तें कांहींच झालं नाहीं, फक्त माझ्या अंगीकाराचं वचन मजला मिळालं आहे; तोंच दीनवत्सला कसा एकदम दैवानं मजवर घाला घातला ! देवा माझे प्राणनाथ खुशाल असले ह्मणजे चांगलें आहे. अरण्यांत तीक्ष्ण नखांचीं व शृंगांचीं क्रूर श्वापदं असतात, तेव्हां त्यांतून कोणाच्या सपाट्यांत सांपडले आहेत, किंवा काय आहे तें कळत नाहीं. आतां ते शूर आहेत, तेव्हां त्यांस एकाएकीं कोणाच्यानं उपद्रव देववणार नाहीं. परंतु असावध असतां जर एखादं विघ्न आलं तर काय करतील ? कां तस्करांची त्यांची गांठ पडली ! काय असेल तें एक जगन्नाथा तुला ठाऊक. असा विलाप करीत असतां श्रमानें व दुःखानें व्यथित असल्यामुळें तिजला थोडीशी निद्रा लागली.

इकडे रूपसुंदराची खुण घेऊन राजपुत्राच्या शोधास गेलेल्या लोकांनीं त्या मार्गाच्या आसपास पुष्कळ

शोध केला. परंतु उपयोग काय! **मदनबाण** व पुष्पावती यांच्या शोधास गेलेले लोक अद्याप कां येत नाहींत; यामुळें **रूपसुंदरास** चैन पडेना. त्यानें बहुत वेळ त्यांची वाट पाहिली; परंतु कांहींच समाचार कळेना. यामुळें तो फार घाबरला आणि त्याचे मनांत विलक्षण प्रकारचे तर्क येऊं लागले. तो आपल्याशींच ह्मणतो, स्त्री आणि धन या दोन गोष्टी दुःखाला कारण आहेत. त्यामुळें मनुष्यावर नानाप्रकारचीं नसतीं संकटें येतात. तेव्हां राजपुत्राबरोबर ही सुंदर स्त्री असल्यानें तर कांहीं संकट आलें नाहींना? किंवा आतां त्याला माझी आठवण कशाला राहील! कारण तो सुखसमुद्रांत अघमर्षण करीत आहे, तेव्हां त्या आनंदांत मी कः पदार्थ. परंतु माझे मित्राचे हातून असें वर्तन कालांतरींही होणार नाहीं. काय असेल तें असो! सेवक आल्याशिवाय आपणास खरें कांहींच कळणार नाहीं. अशा विचारांत तो निमग्न असतां स्वार येऊन पोहोंचले. त्यांचे बरोबर आपला मित्र व वहिनी नाहीं असें पाहिल्याबरोबर त्याचें काळीज धस्स झालें! अंतकरणांत दुःखाचा उमाळा झाला!! नेत्रांतून दुःखाश्रु टपटप खालीं पडूं लागले!!! तरी तो विचारी असल्यामुळें त्यानें विवेकानें शोक आवरून सेवकांस वर्तमान विचारिलें. तेव्हां सेवकांनीं सांगितलें कीं, महाराज आपण आह्मांस कथन केल्याप्रमाणें आह्मीं सर्व ठिकाणें शोधिलीं; परंतु कोठेंही कांहींच तपास लागेना. अमुक मार्गानें गेले

असेंही कोणी सांगेना. हा काळपावेतों आह्मीं सर्व अरण्य धुंडाळलें, दहा कोशपर्यंत मार्गानें जाऊन आलों, परंतु आमच्या जाण्याचें सार्थक्य झालें नाहीं.

तेव्हां **रूपसुंदरास** फार वाईट वाटलें. त्याची ती चंचल दुःखी स्थिति पाहून राजानें त्याचें पुष्कळप्रकारानें शांतवन केलें. राजा ह्मणाला, आपण कांहा चिंता करूं नका; ते वीरपुरुष आहेत, तेव्हां त्यांस बहुतकरून कोणाच्यानें उपद्रव देववणार नाहीं. उद्ईक त्यांची तुमची भेट होईल. मी आणखी सांडणीस्वार त्यांच्या तपासास पाठवितों. आपण स्वस्थ असावें.

दुसरे दिवशीं प्रभातकाळीं **रूपसुंदर** राजपुत्राच्या शोधास जाण्याकरितां निघाला. तेव्हां राजानें त्यांस सांगितलें, आपणांस स्वतः जाण्याचें कांहीं कारण नाहीं. मीं रात्रीं स्वार पाठविलेच आहेत, आणखी आतांही पाहिजे असल्यास पाठवितों. **रूपसुंदरानें** एकच उत्तर दिलें कीं, मला गेलें पाहिजे. तेव्हां निरुपायास्तव राजानें आपले कांहीं निवडक हुशार स्वार बरोबर देऊन त्यास रवाना केलें.

## भाग चौथा.

आमच्या वाचकांना **अनंगपुरचें** व **क्रूरसेनाचें** वर्तमान ऐकण्याची उत्कंठा झाली असेल, व होणेंही

बाजवी आहे. तरी या भागांत त्याचें थोडेसें वर्णन करितों.

आपल्या हातून आतां क्रूरसेनाचा पराजय होत नाहीं असें पाहून नाइलाजामुळें कुसुमचाप राजाच्या हुकमानें सेनापतीनें राजवाड्यावर तहाचें निशाण लाविलें. तेव्हां क्रूरसेनाचे लोक हर्षयुक्त होत्साते मोठ्या गर्वानें विश्रांति घेण्याकरितां तळ देते झाले. मग काय कोणी स्वस्थ निद्रेंत निमग्न आहेत, कोणी आपल्या अश्वांची खटपट करीत आहेत, कोणी आपलें सामान तपाशीत आहेत, कोणी बहिर्दिशेस गेले आहेत, कोणी हवा घेत फिरत आहेत, अशा प्रकारें जिकडे तिकडे सामसूम असून सरकार वगैरे पांच पन्नास मंडळी नुकत्याच मिळविलेल्या जयाच्या वाता मारीत निर्धास्त बसले आहेत.

अशा समयीं, ( मागें सांगितलेंच आहे कीं, सर्वानुमतें पुष्पावतीस क्रूरसेनास देऊन आलेलें अरिष्ट टाळावें, असें ठरलें होतें. त्याप्रमाणें पुष्पावती क्रूरसेनास देण्याचें कबूल करण्याकरितां ) कुसुमचाप राजाचा शौर्यसागर प्रधान क्रूरसेनाकडे गेला. त्रिवार मुजरा करून हस्त जोडून ह्मणाला, महाराज आमचे सरकारांनीं आपणांस पदरांत घेण्याची विनंति करण्याकरितां मला हुजूर पाठविलें आहे. तरी कृपा करून युद्ध करण्याचें सोडून देऊन पुष्पावतीचा अंगीकार करावा.

हें भाषण ऐकतांच क्रूरसेनास जो आनंद झाला

तो वर्णन करतां येत नाहीं. त्याचें मुख सतेज दिसूं लागलें, व तो मोठ्या डौलानें आपल्या प्रधानास ह्मणाला कां प्रधानजी " जंव ना देखिलें पंचानना तंव जंबूक करी गर्जना " अहो, जोंपर्यंत चवदावें रत्न काढिलें नाहीं, तों पर्यंत सर्व गमजा चालतात. कुसुमचापराजा आतां कसा वठणीस आला. व नाक घांशीत कन्येच्या पाणिग्रहणाविषयीं विज्ञाप्ति करीत आहे. अस्तु. ज्याकरितां आपण इतके दूर येऊन प्राणहानी व द्रव्यनाश करण्याचें मनांत आणिलें होतें, तेंच जर प्राप्त होत आहे, तर नाहीं कोणी ह्मणावें? याप्रामाणें क्रूरसेनानें आपल्या प्रधान वगैरे मंडळीस सांगून, कुसुपचापाच्या प्रधानास सांगितलें, फार उत्तम आहे, अगोदरच जर ही गोष्ट मान्य केली असती, तर या थराला कां आलें असतें? असो " गतं नशोचामि " आतां एवढेंच करा कीं मुहुर्त मात्र जवळचा धरा. हें ऐकून **शौर्यसागर** ह्मणाला, महाराज आतां विलंब लावण्याचें कारणच नाहीं. चरणापाशीं एक विनंति आहे, आज्ञा होईल तर विदीत करितों. तेव्हां **क्रूरसेन** ह्मणाला हं बेलाशक बोला. आतां तुह्मी आह्मी एकच झालों. **शौर्यसागर** ह्मणाला, सरकार हे चरण राजवाड्याला लागावे, अशी आमच्या महाराजांची फार इच्छा आहे; तर राजवाड्यापर्यंत येण्याची मेहेरबानी व्हावी.

याप्रमाणें शौर्यसागराचें नम्रपणाचें भाषण ऐकून, व क्रूरसेनही पुष्पावतीस अवलोकन करण्याविषयीं

फार उतावीळ झाला होता, त्यामुळें त्यानें येण्याचें तात्काळ कबूल केलें.

प्रधानानें पुढें जाऊन बैठकीची वगैरे तयारी करविली. कांहीं अवकाशानें क्रूरसेन उत्कृष्ट प्रकारचा भरजरी पोषाख करून, कांहीं निवडक मंडळी बरोबर घेऊन, मोठ्या हर्षानें आतां प्रिया आपल्या दृष्टीस पडेल, अशा तर्कांत गर्क होत्साता श्वशुरगृहीं आला. मग काय विचारतां, येतांक्षणीं खडी ताजीम होऊन राजानें स्वतः त्यास सिंहासनावर बसविलें. नंतर मुजरे होऊन इतर मंडळी आपापल्या योग्यस्थानीं बसली पोषाख, विडे, हार, तुरे, अत्तर, गुलाब झाल्यावर उभयतांचे कुशल प्रश्न चालले असतां क्रूरसेनानें पुष्पावतीस पाचारण करण्याची सूचना केली. त्यावरून सेवकांनीं जनानखान्यांत जाऊन राणीसाहेबास सांगितलें कीं, धाकट्या कन्याबाईस तिकडे बोलाविलें आहे. तेव्हां विलासरंभेनें आपल्या दासीस पुष्पावतीच्या महालांत जाऊन तिजला तिकडे पाठविण्यास सांगितलें. दासी महालांत जाऊन जों पाहते तों पुष्पावतीच्या अत्यंत प्रीतींतील दासी जी वसंतिका ती मोठमोठ्यानें रुदन करून मस्तक फोडून घेत आहे, तोंडानं कोणी दुष्टानं घात केला, कोणा चांडाळाला पाहावलं नाहीं, असें ह्मणत आहे. तें ऐकून व पाहून राणीच्या दासीस फार नवल वाटलें, व ही अशी कां करिते हें कांहींच कळेना. तेव्हां ती ह्मणाली सखे वसंतिके, काय झालं तरी काय ? अग

असं कां करतेस ? तुझा कोणता बाई घात झाला ? सांग पाहूं ? अग सांगितल्यावांचून कसं कळेल ! मुक्याचं जाणतं कोण आहे ! उगी रडूं नकोस ! काय तुझा नाश झाला असेल तो सत्वर सांग; ह्मणजे लौकरच उपाय करण्यास ठीक पडेल. हे शब्द ऐकतांच तर वसंतिकेनें डोकें आपटून ऊर बडवूं लागली. तेव्हां तिला आवरून धरण्यास फार प्रयास पडले. मग मोठ्या कष्टानें ह्मणाली, रात्रीपासून **पुष्पावती** बाईसाहेब नाहींशा झाल्या आहेत; कोणीं त्यांस फसवून पळवून नेलं असावं असं वाटतं. काल संध्याकाळीं त्यांची मुद्रा कावरीबावरी दिसत होती. त्यांनीं आंगावरील भूषणं काढून पेटींत ठेविलीं. पेटीला मजबूत कुलूप घालून त्यावर आपली खूण केलेली आहे. या सर्व चिन्हांवरून त्या कोणाच्या तरी नादीं लागून पळून गेल्या यांत संशय नाहीं. **वसंतिके**च्या तोंडचे हे शब्द ऐकतांच दासीनें राणीकडे जाऊन शोकस्वरानें तिजला सर्व हकीकत निवेदन केली. मग काय विचारतां! जिकडे तिकडे रुदनाला आरंभ झाला, शोकानें सर्व जनानखाना दणाणून गेला, **विलासरंभे**च्या शोकाळा तर पारावार नाहींसा झाला. आईच ती, तिनें आकांत मांडला. मस्तक आपटूं लागली. नानाप्रकारें विलाप करून तिनें **क्रूरसेना**वर शिव्याशापांची लाखोली घातली. व म्हणूं लागली कोणी कसें तरी करून माझ्या बाळेची भेट करा. कोणा पाप्याला माझ्या मुलीचं गोजिरवाणं रूप पाह-

चवलं नाहीं; त्यांनीं डोळ्यांत माती कां घालूं नव्हती. हा सर्व खेळ त्या दुष्टानें केला असावा ! यांत शंकाच नाहीं. मेल्याला फौजेची मोठी मस्ती आली होती, तर रानावनांत जाऊन आपली खुमखूम जिरवायची होती. त्याचा लोकांना विनाकारण त्रास कां ? कोणी आपली मुलगी दे ह्मणून कां देत असतो ! हीं ज्याच्या त्याच्या मर्जीवरची गोष्ट आहे. मेल्या चांडाळानं प्राणनाथांच्या जिवाला घोर लावून, मनुष्यहानी केली ती केलीच, आणखी जुलमानं पुष्पावतीस देत असतां कपटानं लाडकीला घेऊन गेला. माझ्या बाईला दारचं उन माहीत नाहीं. ती आतां कुठं असेल ! काय करीत असेल ! व तिची खाण्यापिण्याची व्यवस्था कोण ठेवीत असेल ? प्रातःकाळीं थोडा वेळ जर भोजनाला उशीर झाला तर लागलेंच बाईला पित्त होऊन डोकं दुखुं लागावं. अशी तिची प्रकृति आतां कोण संभाळील ! अग बेटा पुष्पावती तूं कशी निष्ठुर होऊन मला सोडून गेलीस ! तुला तरी माझी कांहीं दया यावयाची होती ! तुझ्याकडे तरी काय दोष ! ज्याअर्थीं तूं इतकी शहाणी असून फसली आहेस त्याअर्थीं नेणाराही महा ठक व माझं दैव खोटं ह्मणूनच आज मजवर आकाश कोसळलं आहे. आतां बाळेला कुठं पाहूं ! माझी बाई पुन्हां माझ्या दृष्टीस पडेल काय ? असा अनेक प्रकारांनीं विलाप करून करून ती शोकानें विव्हळ होऊन जमिनीवर निचेष्टित पडली.

ही बातमी कर्णोपकर्णी गुप्त रीतीनें शौर्यसागरास कळली होती. त्यावरून तो सावध होता. कारण आतां **क्रूरसेनास** हें सत्य वाटणार नाहीं, व तो पूर्वींपेक्षांही फार संतापून नगराची धुळधाण करून टाकील. याजकरितां युक्तीप्रयुक्तीनें **क्रूरसेनास** अटकेंत घालावें; असा विचार करून त्यानें सदरील प्रमाणें थाट जमवून आणला. व गुप्त रीतीनें कोणास अगदीं कळूं न देतां त्यानें सैन्याची जय्यत तयारी करून ठेविली होती. **क्रूरसेन** हा फार स्त्रीलंपट असल्यामुळें तो **पुष्पावतीस** लुब्ध होऊन मागील कांहींएक व्यवस्था न लावतां व शत्रूच्या घरीं जावें किंवा नाहीं याचाही विचार न करितां जलदीनें राजवाड्यांत गेला होता. " विनाशकालींविपरीतबुद्धि " सैन्यांत सर्व अव्यवस्था असून बहुतेक लोक निद्रेंत निमग्न होते. व सारी फौज मन मानेल तिकडे पसरली होती. अशी संधी राखून **शौर्यसागरानें** वरील बेत अमलांत आणण्याचा दृढ निश्चय केला.

इतक्यांत **पुष्पावती** नाहींशी झाल्याची दुष्ट वार्ता दरबारांत येऊन पोहोंचली. तेणेंकरून राजास मनस्वी दुःख झालें तें सांगतां पुरवत नाहीं. रूपवान्, गुणवती, चतुर, आणि त्यांत आवडती. राजानें अत्यंत दुःखानें प्रधानजीस सांगितलें कीं, ती वाड्यांतच कोठें दडून बसली असेल; तिच्या एकटीच्यानें कोठेंही जाणें होणार नाहीं. ती फार भितरी आहे. याजकरितां वाड्यांतच नीट पहा. प्रधानजीनें आज्ञेप्रमाणें स-

वें वाडा, मशाली लावून तळघरें, अडचणीच्या जागा सुद्धां पाहिल्या. परंतु तिचा ठिकाण नाहीं. मग मात्र सर्वांचे हातपाय गळाले, कमर बसली, व पुढें काय करावें, हें कांहींच सुचेना. हें वर्तमान श्रवण करून व ती प्रत्यक्ष प्रकार पाहून **क्रूरसेनास** अतिशय क्रोध आला. त्यानें जाणलें कीं, यांत खरेपणा कांहीं नसून हें सर्व थोथांड आहे. कांहीं तरी दग्याची गोष्ट दिसते. त्यामुळें **क्रूरसेन** संतापानें लाल झाला, व राजास ह्मणाला, तुमची अझून खोड मोडली नाहीं. बरें कांहीं चिंता नाहीं, दाखवितों आतां कसें आहे तें. असें बोलुन आपल्या मंडळीस ह्मणाला, पाहतां काय चला राजवाडा हस्तगत करून वाड्याचा झाडा घेतल्यावांचून पुष्पावती स्वाधीन होत नाहीं. फौजेची तयारी करवून वाड्यावर तोफा चढवा. असें ह्मणून खालीं जों उतरून येतात, तों पूर्वसंकेताप्रमाणें **शौर्यसागरानें** बंदोबस्त करून रस्ते बंद केले होते; व राजवाड्यास आपल्या लोकांचा वेढा घातला असून हत्यारबंद हुषार कवाईत शिकलेले असे दोनशें लोक त्यांना कैद करण्याकरितां घेऊन पुढें आला. आणि आपल्या लोकांस ह्मणाला, पहातां काय, यांना योग्य शासन केलेंच पाहिजे. कारण आम्हीं कोणत्याही प्रकारें यांचा अपराध न करितां विनाकारण आमच्या नगरावर फौजेच्या घमेंडीनें चाल करून आले; आणि आमच्या लोकांचे व्यर्थ प्राण घेतले. तेव्हां यांस आतां कैद केलें असतां त्यांत देवाचा आपणांस कांहीं

एक दोष लागणार नाहीं. एका क्षणापूर्वी सिंहासारखा मयमद असा क्रूरसेन या वेळेस केवळ गरीब मृग होऊन लांडग्याच्या कळपांत सांपडला. क्रूरसेन आदिकरून सर्व लोकांना बेलाशक कैद करून तुरुंगांत पाठवून दिलें. काय करतील बिचारे ! पंचवीस तीस लोकांचा दोनशें लोकांपुढें काय उपयोग होणार ! आणखी त्यांत घरांतच गांठून काम साधलें. हे शूर खरे. परंतु सांपळ्यांत अडकल्यावर काय चालणार, तद्वतच. जो घटकेच्या अगोदर राजपद भोगणारा भाग्यशाली महान् पराक्रमी राजा होता, तो आतां कारागृहवासी बंदिवान झाला. यावरून दैवगती विचित्र आहे. व स्त्रियेची अशाही फार कठिण आहे. त्यांना तुरुंगांत घालून व त्यांजवर सक्त पहारा ठेवून त्यानें कडक बंदोबस्त केला. नंतर आपलें तयार केलेलें सर्व लष्कर बरोबर घेऊन एकाएकीं क्रूरसेनाच्या फौजेवर छापा घातला. मग काय, आधींच असावध, त्यांत निद्रिस्थ, हत्यार वगैरे सामान जवळ नाहीं, मग ज्यास जिकडे वाट फुटेल तो तिकडे आपला जीव वांचविण्याकरितां पळत सुटला. याप्रमाणें क्रूरसेनाच्या सर्व फौजेची दाणादाण करून सैन्य पळवून लावलें. घोडे, तोफा, आदिकरून जी लूट सांपडली, ती नगरांत घेऊन आले.

हें प्रधानाचें चातुर्य, धारिष्ट आणि साहस पाहून कुसुमचाप राजास आश्चर्य वाटलें. यांतील गुप्त मसलत राजास कांहींच माहीत नव्हती. शौर्यसागरानें

सर्व मजकूर राजास कथन केला. त्या योगानें राजास बहुत संतोष झाला. त्यानें प्रधानाची फारफार प्रशंसा केली. व आपल्या सर्व मानकऱ्यांच्या समक्ष स्पष्ट ह्मणाला कीं, असलीं स्वामीकार्यतत्पर माणसें पदरीं असल्यावर बहुतेक दुसऱ्यापासून अपाय होण्याची काळजी बाळगणें नको. नंतर भंडारखाना मोकळा करून व शत्रूच्या लुटींत जें द्रव्य सांपडलें होतें ते घेऊन विप्र, गरिबगुरीब, अंध पंगु, अतीत, अभ्यागत, गोसावी, बैरागी, फकीर वगैरे सर्वांना वांटून टाकलें. प्रधानास सुंदर पोषाख देऊन इतर मानकऱ्यांसही त्यांचें योग्यतेनुरूप पोषाख दिलें. फौजेसही बक्षिस देऊन लुटींतील सामान वांटून दिलें. याप्रमाणें त्या द्रव्याचा सद्व्यय करून प्रधान वगैरे मंडळीसमवेत राजा कन्येच्या महालांत आला. बारीक रीतीनें व युक्तीनें चौकशी करतां खास कळलें कीं, पुष्पावती निळ्या घोड्यावर बसून कोणाबरोबर तरी निघून गेली आहे. या तपासापासून इतकेंच निष्पन्न झालें कीं, पुष्पावती जीवंत असून कोठें तरी तिचा शोध लागण्याचा संभव आहे. व तेणेंकरून कधीं तरी भेट होण्याची आशा आहे. एवढेंच दुःखांत सुख मानून तिच्या शोधाकरितां देशोदेशीं सांडणीस्वार व गुप्त हेर पाठविले.

# भाग पांचवा.

मागील तिसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें रूपसुंदर राजपुत्र **मदनबाण** व राजकन्या **पुष्पावती** यांच्या शोधास निघाला. त्यानें मोठ्या चातुर्यानें तपास चालविला. परंतु उभयतांचाही कांहींच पत्ता लागत नाहीं, असें पाहून त्याचें धैर्य खचलें तरी शोध करितो आहे तों दैवयोगानें समोरून घोड्यावर बसून कोणी येत आहे असें दिसलें. तेव्हां **रूपसुंदरास** बहुत हर्ष झाला. त्यास वाटलें कीं, आपला जिवलग मित्र **मदनबाणच** असावा. परंतु जवळ आल्यावर त्याची ती सर्व आशा निर्फळ झाली. दुःखांत सुख इतकेंच कीं, ती मुशाफर वेषधारण केलेली **पुष्पावती** होती. अगदीं जवळ आल्यावर पुष्पावतीनें झटदिशीं खालीं उडी टाकिली; आणि कंठ मोकळा करून शोकानें तें सर्व अरण्य दणाणून टाकलें.

पु०—भावोजी तुह्मी काल होता कुठं ! तुमच्या एका दिवसाच्या वियोगानं असा दुर्धर प्रसंग प्राप्त झाला. आपणांस कांहीं प्राणनाथांचा शोध लागला आहे कां ?

हे शब्द ऐकतांच **रूपसुंदराचा** चेहरा खरकन उतरला, मुखावर कालिमा आली, व तोंडांतून शब्द निघेना. त्यास वाटलें होतें कीं, वहिनी आल्या,

तेव्हां मित्रही कोठें मागें पुढें जवळ पास असेल. परंतु प्रस्तुतच्या तिच्या भाषणानें तें सगळें नष्ट झालें. त्यास फार दुःख झालें. व तोही तिच्यासारखा रुदन करूं लागला. तेव्हां बरोबरच्या मंडळीनें त्यास सांगितलें; महाराज हें काय, बाईसाहेबांची भेट झाली, यावरून सुदैवानें त्यांची ही त्वरीतच गांठ पडेल, त्यांची व बाईसाहेबांची चुकामुक कधीं, कोठें व कशी झाली, हें विचारावयाचें सोडून शोकाकुल काय झालां? धीर धरा सावध व्हा. मग उभयतांनीं अंमळ शांत झाल्यावर आपापली हकीकत परस्परांस थोडक्यांत कळविली. तेव्हां कांहीं अंशीं पुष्पावतीस आनंद झाला. भावोजीना त्यांच्या मनाप्रमाणें वधु प्राप्त झाली; ही गोष्ट समाधान मानण्यासारखी झाली खरी. परंतु मदनबाणाच्या वियोगजन्य दुःखानें तिजला कांहीं चैन पडेना. रूपसुंदरानें विवेकानें शोकाचा आवर करून पुष्पावतीस म्हणतो—

रू०—वहिनी तुह्मी कांहीं काळजी करूं नका. तुमची माझी भेट झाली आहे तर तुह्मी आतां स्वस्थपणें नगरांत चला, व आपल्या पुढील होणाऱ्या सुखाकडे लक्ष्य देऊन प्रस्तुतचें दुःख विसरा, आणि आपल्या जावेजवळ रहा. मी हरप्रयत्नानें मदनबाणाचा शोध लावून त्यास घेऊन येतो.

पु०—भावोजी तें कांहीं होणार नाहीं. मी आपल्या बरोबर येत्यें मजला घेऊन जावं.

रू०—वहिनी तुह्मी निःसंशय आनंदांत नगरांत रहा. मी त्यास आणल्या खेरीज आपणांस मुख दाखविणार नाहीं. त्यांतून तुह्मांस बरोबर नेलें असतें, परंतु त्या राजश्रींना शिकारीचा नाद फार आहे, व आपल्या सांगण्यावरून तो शौचास गेला आहे. त्या अर्थी तर स्वारी खरोखर एखाद्या श्वापदाच्या मागें गेली असावी. याजकरितां आम्हांस आतां सर्व अरण्य धुंडाळलें पाहिजे. अरण्यांतील मार्ग फार अवघड कांटेरी झाडें, यामुळें आपल्याच्यानें तो प्रसंग सहन होणार नाहीं. यास्तव तुह्मी नगरांत राहावें; हेंच मला फार बरें दिसतें. यावर तुमची मर्जी.

असें रूपसुंदराचें समजुतीचें भाषण श्रवण करून पुष्पावतीनें नगरांत जाण्याचें कबूल केलें. नंतर रूपसुंदरानें तिजला नगरांत पोहोंचवून तिची व्यवस्था चांगल्या प्रकारें ठेवण्यास सांगून आपण निघून गेला.

आतां ही आपल्या भ्रताराच्या धन्याची व जीवलग मित्राची प्रियभार्या होणार. तेव्हां त्यांची तजवीज उत्कृष्ट राखिली पाहिजे. असा विचार करून तिच्या इच्छेप्रमाणें चंपकमालती वागूं लागली. एके दिवशीं अस्तमानच्या सुमारास ह्या दोघींनाही करमेनासें झालें. तेव्हां

चं०—पुष्पावतीबाई, घटकाभर करमणुकीकरितां आपल्या बागेंत येत असल्यास चलावें.

पुष्पावतीसही त्या हृद्रोगानें अगदीं उदास करून टाकल्यामुळें उपवन क्रीडेस जावें म्हणजे तरी

कांहीं वेळ जाईल. नेहमीं बसून जळलं तेंच तें दुःख डोळ्यापुढं जसं दिसत आहे. त्यामुळं बाई जीवं अगदीं वेड्यासारखा झाला आहे.

तेव्हां दोघी जणी कांहीं प्रीतींतील दासी सहवर्त-मान आपल्या रमणीय बागेंत गेल्या. इकडे तिकडे फिरत असतां जाईच्या वेली जवळ आल्या. त्या योगानें तर त्या दोघींचें विरह दुःख जास्त प्रखर हो-ऊन अनिवार्य झालें.

पु०—सखे **चंपकमालते** आपण दोघींही सम-दुःखी आहोंत. अग या जाईकडं पाहिल्यानंतर बाई फारच त्रास होत आहे. पहा कशी ती निर्लज्ज हो-त्साती त्या अम्रवृक्षास अलिंगन देऊन वर गेली आहे. सखे,परमेश्वर आपल्याला कधीं बरं असा प्रसंग आ-णील. काय प्रारब्धीं असेल तें खरं. भावोजींस गेल्यास उणे पुरे पंधरा दिवस होत आले; अझून कां येणं होत नाहीं. कोण जाणं! मग काय असलं तें परमेश्वरास ठाऊक. बाई शरिरानं बरं असावं म्हण-जे झालं. **जय आंबे** जगदंबे आठ दिवसांत येणं हो-ऊं दे. म्हणजे आम्ही उभयतां जोड्यानं तुझ्या दर्श-नास येऊन तुला **वज्रचुडे** जडावाचे वाहीन. सखे, कधींग आपले प्राणनाथ येतील?

चं०—अहो बाई तुम्ही तरी माझ्यापेक्षां जास्त सुखी आहांत. तुमचे व तुमच्या प्रियतमाचें कांहीं काळपावतों भाषण होऊन थोडा बहुत सहवासही झाला आहे. तुम्ही आपली ध्यानस्त मूर्ति मनमुक्ति अव-

लोकन केली आहे. पण बाई माझं सगळं तुमच्या उलट आहे. अहो पुरतं तें मुखकमल सुद्धां पाहिलं नाहीं; घोड्यावर पाहिलं तेवढंच. अहाहा ! काय तें सुंदर. (लाजून) खरंच नांव शोभतं आहे. आपण कधीं हो आतां पूर्ण सुखांत दिवस घालवूं. देवा आह्मी गरीब गायांनीं असा तुझा कोणता अपराध केला ह्मणून आमची इतक्यांतच तुटातुट केली.

पु०—सखे, जों जों या बागेंत फिरावं तों तों मन उद्विग्न होऊन प्राणनाथाचं स्मरण होतं. अग सध्यांचे आपले दिवस प्रियासहवर्तमान उद्यानांत वसंतऋतूमध्यें प्रखर उष्णाचा दाह शांत करण्याकरितां फिरण्याचे असोन प्रियतमास मोठ्या प्रीतीनें व भक्तीनें सुगंधी उटी लावून अनेक प्रकारच्या पुष्पांचे हार सुरेख गुंफून अर्पण करावें. तसेच हस्तांत गजरे घालावें. आणि प्रेमानंदानें घट्ट अलिंगन देऊन चांद्रिकेंत विश्रांति सुख अनुभवावं.

चं०—खरंच बाई या दिवसांत उष्मा फारच होत असल्यामुळं मंदिरांत राहवत नाहीं; ह्मणून उपवनांत सरोवरावर बंगल्यांत किंवा तेथें त्रास होऊं लागला तर जवळच्या लता मंडपांत एकांतांत गुज गोष्टी सांगण्याचे दिवस खरे.

पु०—सखे प्राणपतींवांचून हे दिवस व्यर्थ चालले आहेत. अग मुळींच आपली व आपल्या मनोहरांची भेट झाली नसती व त्यांच्या चरणीं आपली मनं तल्लीन झालीं नसतीं,तर इतकं वाईट वाटलं नसतं.

परंतु पूर्ण चंद्र सगळ्या तेजानं प्रकाशमान होत असतां मध्येंच त्यास ग्रहण लागावं, आणि सर्व विशोभीत व्हावं, त्याप्रमाणं झालं. त्यानं बाई फार दुःख होत आहे.

चं०—खरंच सुखपर्वताच्या शिखरावर विराजमान होणार तोंच वियोग धक्क्यानं खालीं ओढलें. आपण दुर्दैवी खऱ्या.

पु०—कांहीं कर्मणूक होऊन वियोगाचं विस्मरण व्हावं ह्मणून आपण बागेंत आलों तों येथें विरहानल जास्तच भाजूं लागला. सखे, येथच्यापेक्षां मग महाळांत तरी वरं. इथें एकेक सुंदर पहावं त्यानं तर बाई फारच ताप होतो.

चं०—बाई मंदिरांत काय कमी. तिथं ही असंच किंबहुना जास्त ह्मटलं तरी चालल. तिथं ही पानदान मंचक पुष्पशय्या अवलोकन केली ह्मणजे आगांची आग होते.

पु०—असो बाई आपलं नशिब त्याला काय करायचं आहे. मला तर कांहीं सुचत नाहीं, अन्नसुद्धां गोड लागत नाहीं. परमेश्वर ठेवील तसं राहिलं पाहिजे. आपल्या स्वाधीन काय आहे ? त्याच्या कृपेनें मनाप्रमाणं सर्व गोष्टी घडून येतील असं मला वाटतं ( आनंदानं ) सखे, अग माझा डावा डोळा लवूं लागला. त्याप्रमाणें डावा बाहु स्फुरण पावत आहे. हीं सुचिन्हें असावींत, यावरून खचित आज आपापले पती भेटतील. मला एकदम हुशारी वाटूं

लागली. व मन कसं आनंदानं उचंबळत आहे. तर सखे चला नगरांत जाऊन आपण आपापल्या प्रियकरांची वाट पहात बसूं.

याप्रमाणें पुष्पावतीची संतुष्ट वृत्ति पाहून चंपकमालतीसही समाधान वाटलें. व दोघी जणी आनंदानं नगरांत आल्या.

मागें सांगितलेंच आहे कीं, तो नादांत असल्यामुळें त्या निबीड अंधकारांत आपण कोणत्या मार्गानें आलों, आपली सुंदरी कोणत्या स्थळीं वाट पहात बसली आहे, याचा राजपुत्रास कांहीं एक अजमास करवेना. तो मनांत ह्मणूं लागला, मी त्या सुकुमारीपासून किती लांब आलों आहे, पुष्पावती एकटी अशा घोर अरण्यांत काय करील ! कदाचित् रात्र जास्त झाली असतां ती नगराकडे गेली असेल, रूपसुंदराची तिची भेट झाली असेल. छेः छेः ती मजला अशा बिकट ठिकाणीं सोडून कधींही नगराकडे जावयाची नाहीं. मित्र तरी मला काय ह्मणत असेल. स्त्रियेला एकटीला वृक्षाखालीं बसवून आपण शिकारीच्या नादीं लागणें ह्मणजे मूर्खपणाच आहे. तो पहिल्यापासून मला छांदिष्ट म्हणतच आहे. परंतु आजच्या खेपेस माझे हातून परोपकार झाला आहे. माझ्या सुंदरीची काय अवस्था झाली असेल ! तिची माझी भेट कधीं होईल ! असो विचार करीत बसणें या वेळेस उपयोगाचें नाहीं. आपल्या प्रियेचा लौकर शोध केला पाहिजे. न जाणों, मी इतका वेळ

आलों नाहीं, यामुळें मित्र व ती अरण्यांत माझ्या शोधाला जर कां शिरलीं तर मग गांठ पडणें ह्मणजे कपिलाषष्ठीचाच योग ! अशाच प्रकारचें हें महावन आहे. आतां घोडा भरधांव काढून मार्ग सत्वर आक्रमावा, तर घोड्यास चालतां येण्यासारखा रस्तासुद्धां नाहीं. बरें घोड्यावरून खालीं उतरून मार्गक्रमण करावा, तर या कंटकमय रानांत चरण संपुटें निमिषमात्रसुद्धां टिकणार नाहींत. अशा घोर काळजीनें तो अगदीं त्रस्त झाला आहे, इतक्यांत एक मोठी भयंकर किंकाळी त्याच्या कर्णरंध्रांत येऊन घुसली. मग काय मार्ग सुधारण्याचें एकीकडेसच राहून त्या श्वापदाची चिंता उत्पन्न झाली. व हा पूर्वींसारखाच कांहीं चमत्कार आहे, किंवा हा खरोखरच क्रूर पशु आहे, हें कांहींच कळेना. हीं दुष्ट घातकी जनावरें कोणत्या रीतीनें मागून पुढून छापा घालतील याचा नियम नाहीं. यास्तव फारच सावध चाललें पाहिजे. मग बंदूक पेटवून तरवार मंडळाकार फिरवीत, जसा मार्ग मिळेल, तसा चालूं लागला. तों वर सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या पंचानाची गर्जना जवळच ऐकूं आली. तेव्हां तो दूर आहे तोंच त्याच्या स्वरावर नेम धरून मदनबाणानें बंदूक झाडली. परंतु आंधारांत व वृक्षाच्या गर्दीमुळें नेम चुकला. तेणेंकरून तो दुष्ट पशु फारच संतापून त्याच्या आंगावर येण्याचा इलाज करूं लागला. परंतु राजपुत्र झाडांच्या गर्दींत उंच ठिकाणीं असून

वाट नसल्यामुळें व्याघ्रास त्या स्थळीं जातां येईना. तेव्हां मदनबाणानें पुनरपि त्याच्या गर्जनेच्या अजमासानें नेम धरून वार काढला. पण पूर्ववतही ही वेळ फुकट गेली. तेव्हां मात्र तो घाबरला, त्याची पांचावर धारण बसली, व त्यास आपलीं शत वर्षे पूर्ण झालीं असें वाटलें. शूर असून करतो काय. आंधारामुळें तो घातकी पशु कोठें आहे हें कळेना. तेव्हां तरवारीचा उपयोग नाहींसा झाला. गोळी लागूं होत नाहीं. बरें आपण निघून जावें तर रस्ताही कळत नाहीं. अशा अडचणींत सांपडला. त्या समयीं त्यानें धैर्य धरून विचार केला कीं, जें होईल तें होवो, आतां रात्रभर येथून हालावयाचें नाहीं. ज्या अर्थीं त्या हिंसक पशूला या स्थळीं येतां येत नाहीं; त्या अर्थीं ही जागा निर्भय असावी, यांत संशय नाहीं. मग परमेश्वराचें स्तवन करीत त्यानें आरोळी फोडली कीं बंदूक झाडावी अशा संकटानें ती रात्र त्यानें घोर चिंतेत घालविली. प्रभातकाळ होतांच व्याघ्र त्याच्या दृष्टीस पडला. मग अचूक गोळी घालून त्यानें व्याघ्रास यमलोकास पाठविलें. आणि करुणाकर ईश्वराचें आभार मानून पुढील मार्ग सुधारला. व आपणाशींच विचार करूं लागला कीं, ज्या अर्थीं कालच्या कांहींच खुणा दृष्टीगोचर होत नाहींत;त्या अर्थीं अगोदर या भयंकर अरण्यांतून बाहेर पडावें;आणि मग इष्ट हेतुच्या सिद्धीस लागावें. कित्येक प्रसंग असे दुर्धर आले कीं, चालण्यास पाऊल

वाट सुद्धां मिळूं नये. तेव्हां तरवारीनें मार्ग साफ करून चालूं लागावें. असें करितां करितां ऐन दोन प्रहराच्या सुमारास सुदैवानें त्यास एक चांगली पाऊल वाट लागली. तेव्हां त्याच्या जिवांत जिव येऊन थोडा आनंद झाला. त्यास वाटलें कीं, बहुतकरून आतां आपलें नष्टचर्य सरलें असावें असें दिसतें. ते उन्हाळ्याचे दिवस, ऐन दोन प्रहरचा प्रखर ताप, जवळ खाण्यास कांहीं नाहीं, पाणी प्यावें तर तेंही दृष्टीस पडेना. त्यामुळें तो अगदीं दीन झाला. क्षुधेनें व तृषेनें व्याकूळ झाल्यामुळें त्यास घोड्यावर देखील बसवेनासें झालें. मग एका दाट वृक्षाच्या छायेंत घोड्यावरील गालीचा टाकून थोडी विश्रांति घेतली. परंतु उदरांत भडाग्नि प्रज्वलीत झाल्यामुळें चैन पडेना. तरी कांहीं वेळ तसा दम धरून अमळ उन्हाची तलखी कमी झाल्यावर अश्वारूढ होऊन चालूं लागला. परमेश्वराची लीला अगाध आहे. त्याच्या सदयतेनें सायंकाळच्या सुमारास तो एका सुंदर शहराजवळ येऊन पोहोंचला. शहराची चौकशी करतां कालेंच भद्रपूर नसून दुसरें असल्याचें समजलें. नंतर धर्मशाळेंत उतरून अगोदर भोजनाची व्यवस्था केली. व अश्वास दाणा देऊन त्याचाही चांगला बदोबस्त केला. रात्रौ त्याच्या मनांत शंका एकामागें एक येऊन मन उदास झालें. प्राणसखी कोठें असेल ? रूपसुंदराची तिची गांठ पडली आहे किंवा नाहीं ? हा त्यास निजध्यास

लागल्यामुळें निद्रा येईना. प्रभातकाळ होतांच त्यानें **भद्रपूरचा** मार्ग धरिला.

इकडे **रूपसुंदरानें** आपल्या मंडळीसुद्धां सगळें वन, जाळ्या, डोंगर, गुहा, शोधल्या परंतु **मदनबाणा**चा ठिकाण नाहीं. असें पाहून, निराश होत्साता ज्या ठिकाणीं सर्वांनीं वन भोजन केलें होतें; व मित्रास पुढें मार्गक्रमण्यास सांगून आपण शहरांत गेला होता; त्या रम्यस्थळीं येऊन कंठ मोकळा करून शोक करूं लागला. अरे माझ्या जिवलगा **मदनबाणा** आपणांस एकमेकांवांचून एक निमिषसुद्धां राहवत नव्हतें. तुला आज पंधरा दिवस झाले अजून तुझी वार्ता सुद्धां लागत नाहीं. आतां मीं आपलें हें कृष्णवदन पुष्पावतीस व तुझ्या मातापितरांस कसें दाखवूं. तुझ्या आईनें विचारिलें कीं, माझा **मदनबाण** कोठें आहे तर काय सांगूं! असा विलाप करीत आहे. तों **मदनबाण**, उदक प्राशन करावें व एकांत स्थळीं जेथें आपला उभयतांचा प्रीति विवाह लागला, त्या रम्यस्थळाचें पुनर्दर्शन घ्यावें, असें मनांत आणून तिकडे येत होता. तों कोणी एक तरुण पुरुष मोठ्यानें शोक करीत असून भोंवतालचे लोक बहुत प्रकारांनीं त्याची समजूत घालीत आहेत, असें पाहिलें. तें अवलोकन करतांच **मदनबाणास** वाटलें कीं, हा आपला मित्र **रूपसुंदर** असावा, परंतु हे लोक कोण असावे, तो तर एकटाच आहे. अमळ पुढें गेल्यावर स्वरावरून त्याची खात्री झाली कीं, **रूपसुंदरच** असून आपल्या विरहानें शो-

शोकाकूळ झाला आहे. अस्तु,परमेश्वराच्या पूर्ण दयेनें आज आपल्यास सुहृद भेट झाली, यावरून प्रियेचीही भेट होईल. अंतःकरणही उल्हासीत झालें आहे. दुष्प्रारब्धाची गति संपली असें खचीत. मग घोड्याला टांच देऊन जलदीनें पुढें गेला, आणि मोठ्यानें सिंहनाद करून ह्मणाला; मित्रा, **रूपसुंदरा** शोकाचा त्याग कर.ज्या करितां तूं विलाप करीत आहेस तो मी **मदनबाण** खुशाल असोन तुझ्या सान्निध्य भागीं आलोंच. हे शब्द ऐकतांच **रूपसुंदरास** जो आनंद झाला तो पोटांत मावेनासा होऊन उदर फोडून बाहेर येतो कीं काय असें झालें. त्यानें मोठ्या प्रेमानें राजपुत्रास घट्ट आलिंगन दिलें, व उभयतांचीं मुखें प्रफुल्लीत दिसूं लागलीं, व त्यांना बहुत संतोष झाला. तो वर्णन करतां येत नाहीं. क्षणैक विश्रांति घेऊन उभयतां महदानंदानें नगराकडे येण्यास निघाले. वाटेनें चालतां चालतां **रूपसुंदरानें** आपली व बहिनीची भेट कशी झाली, व आपलें वर्तमान असें राजपुत्रास कथन केलें. तेव्हां तर राजपुत्रास दुःखाश्चार्यानंद हे विकार एकदम झाले. तो ह्मणाला, खरोखर जगदिशाची आमच्यावर पूर्ण अनुकंपा आहे, यांत संदेह नाहीं. मी स्त्रीसुखांत राहून माझ्या मित्रानें अविवाहीत असावें, हें चांगलें नाहीं. त्या जगन्नियंत्यानें उत्कृष्ट योग आणला, तेव्हां त्याचे आभार किती मानावे. त्यास अनन्य-

भावें शरण जावें हेंच योग्य. मग एकमेक सुखदुःखाच्या गोष्टी बोलत, शहराजवळ आले. तेव्हां बरोबरीच्या मंडळींतील कांहीं स्वारांनीं पुढें जाऊन उभयतां सुखरूप आल्याचा शुभ समाचार **चंद्रसेन** राजास सांगितला. राजानें लागलीच तयारी करवून मोठ्या समारंभानें त्यांस राजवाड्यांत आणिलें. रस्त्यांनीं ज्या ज्या नागरिक जनांनीं त्या दोघांस पाहिलें, त्यांना त्यांचीं सुंदर मनोहर रूपें पाहून हे प्रत्यक्ष रामलक्ष्मणच मानवांचीं रूपें घेऊन पुन्हा या जगतितलावर अवतीर्ण झाले कीं काय असें वाटलें. रीतीप्रमाणें सत्कार होऊन विडे, हार, तुरे, अत्तर, गुलाब झाल्यावर कर्मणुकीस आरंभ झाला. त्या स्थळीं रोषनाई फार सुरेख केली होती. ती पाहून उभयतांचीं मनें संतोष पावलीं. नंतर दरबार बरखास्त होऊन भोजनोत्तर **मदनबाण** व **रूदसुंदर**, **पुष्पावती** आणि **चंपकमालती** अशी ही चौकडी एक्या सुंदर जागेंत बसून अत्यानंदानें परस्परांस भेटून संतुष्ट झाली. नंतर प्रत्येकानें आपलें वृत्त सर्वांस कथन केलें. तेव्हां **मदनबाण** म्हणाला, आजचा हा सुदिन समजला पाहिजे. कारण, असा दिवस येऊन आपण सर्व एके ठिकाणीं बसून आनंदांत काळ घालवूं असें मला तर वाटत नव्हतें. असो आपलें सर्वत्रांचें महद्भाग्य. ह्मणून ह्या मूर्ति दृग्गोचर झाल्या. **पुष्पावती** (चंपकमालतीस विनोदानें) सखे चंपकमालते भावोजींना अवलोकन करण्याविषयीं तुझें मन

फार उत्कंठीत व उतावीळ झालं होतं. तर सखे, आतां आपल्या वल्लभाला पुरतं लक्ष्य लावून मनमुकतं पाहून घे, तुझं ही खरंच आहे, भावोजींच्या चरणीं तुझं मन जडल्यापासून भावोजी निश्चळ असे क्षणभरसुद्धां तुझ्या दृष्टीस पडले नसतील; हें उघडच आहे. सखे, आतां आपण समवयस्क व सांप्रत निष्काळजी असोन प्रत्येकांच्या मनोदयानुरूप इष्ट गोष्टी घडून आल्या आहेत. तरी प्रस्तुत संपूर्णांना अवलोकन प्रकारावांचून अन्य सुखोपभोग होण्याची आशा नाहीं. तेव्हां तीच इच्छा आपण सर्वांनी तृप्त करून घ्यावी; हेंच या समयास उचित आहे. आतां भावोजींची थट्टा करण्याचा मला अधिकार नाहीं. त्यांची योग्यता, प्रौढपणा, धैर्य, साहस, मित्रत्व, स्वामीकार्य तत्परता इत्याद्यनेक गुणांनीं ते संपन्न, व आह्मांस क्षणोक्षणीं संकटांतुन मुक्त करण्याविषयीं केवळ अवतारी पुरुष, भावोजींचे जे आमच्यावर उपकार झाले आहेत ते जन्मवरी फिटावयाचे नाहींत. भावोजींच्या योगानें हे चरण पाहिले. तेव्हां अशा सत्पुरुषाची आपण यःकश्चीत स्त्रीजातीनं मस्करी करणं ह्मणजे आपली मर्यादा घालविणं आहे. पण आपण सगळे एकच आहोंत. तोंडापुढं आलेलं आतां बोलल्यावांचून राहवत नाहीं. मग भावोजी काय ह्मणतील ते ह्मणोत. भावोजींच्या हेतूप्रमाणं सुंदर, कुलीन, गुणवती, चतुर आणि ८८

निश्चयाची स्त्री प्राप्त झाली, तेव्हां ते म्हणत असतील कीं, माझ्या सारखा भाग्यशाली कोण आहे.

इतका वेळ झालेलें भाषण रूपसुंदरानें ऐकून घेतलें, परंतु सांप्रतच्या भाषणानें त्यास बोलल्यावांचून राहवेना. मग तो ह्मणाला, सरकार, धन्यासमोर निर्भिडपणानें भाषण करितों, याची क्षमा असावी. " दिव्याच्या खालीं अंधारच असतो. " तद्वत ज्याचा त्याला अनुभव जसा असतो, तसाच दुसराही त्याला दिसत असतो. " दुर्योधनाला सर्वच दुष्ट वाटत होते. " आमच्या वहिनी दादांबरोबर भाषण करण्यास इतक्या अतुर झाल्या होत्या कीं, त्यांनीं मजला नगरांत जाण्याची तात्काळ परवानगी दिली. या गोष्टीचा प्रत्येकास अनुभव असतां दुसऱ्याच्या नाकांत काड्या घालण्यांत काय अर्थ. वहिनी आपणांस राग येऊं नये.

हें भाषण ऐकून चंपकमालतीस फार हर्ष झाला. तिच्या मनांतून पुष्कळ बोलावयाचें होतें. परंतु तिचा त्यांचा परिचय नसून भ्रतारासमक्ष व राजपुत्रा देखत तिजला बोलवेना. रूपसुंदराच्या मुखांतून हे शब्द निघताहेत तोंच—

पु०—( हंसत ) पाहिलांना कसा आपल्या प्रियेचा कैवार घेतला? ठिकच आहे, जिकडची माया तिकडे जावयाचीच.

म०—( थोडेसें दरडावून ) आतां तुह्मी सर्व उगीच बसा. विनोद करितां करितां एकमेकांचें उणें

काढून कलहावर याल. तेणेंकरून विनाकारण दुःख करून घ्याल. तेव्हां—

पु०—छेः छेः असं कधींच व्हावयाचें नाहीं. इकडं काळजी करायला नको. हें आपलं कर्मणुकीचें विनोद बोलणं आहे.

याप्रमाणें त्यांचा आनंदयुक्त विनोदी संवाद झाल्यावर रात्र बरीच झाली असल्यामुळें तीं सर्व आपापल्या ठिकाणीं जाऊन निद्रिस्त झाली.

## भाग सहावा.

दुसरें दिवशीं तिसरें प्रहरीं मदनबाण व रूपसुंदर हे दरबारांत गेले. तेव्हां राजानें प्रधान कन्येविषयींची गोष्ट काढिली. त्या समयीं मदनबाण ह्मणाला, ज्या अर्थीं आमच्या वहिनींचा रूपसुंदराच्या चरणीं इतका निर्धार आहे, त्या अर्थीं त्यांचें ह्मणणें आह्मांस मान्य करणें योग्य आहे. आम्ही प्रधानसाहेबांचे कन्येचें पाणिग्रहण करण्याविषयीं अभिवचन देतों. आतां आम्ही क्रीडावतीस जातों. नंतर आपणांस लिहून पाठवूं त्याप्रमाणें आपण तयारी करून निघून यावें. अद्याप माझाही शास्त्रोक्त रीतीनें विवाह झाला नाहीं. सांप्रत आमचे हे मानसिक विवाह झाले आहेत. आम्हांस जाण्याविषयीं आज्ञा व्हावी. आम्ही राहिलों असतों. परंतु आम्ही आपल्या नगरांहून वि-

श्वपर्यटणांस निघाल्यापासून आह्मांस संतोषही बहुत झाला, व दुःखेंही अतिशय सोसावीं लागली. आणखी आम्ही मातापितरांची आज्ञा न घेतां आपल्याच हेकेखोरपणानें पलायन करून हें देशपर्यटणाचें दुर्घट कृत्य केलें. आतां घरीं लौकर जाऊन मातापितरांचें तसेंच इतर आप्तांचें समाधान करावें; अशी फार उत्कंठा झाली आहे. तसेंच मातापितरांस कधीं अवलोकन करूं, असें वाटत आहे. त्याचप्रमाणें आमचे माता पिता आह्मांवांचून कष्टी, व आमची खंती करीत असतील. त्यांना दुःख सागरांतून काढण्यास आह्मांस आतां त्वरीतच गेलें पाहिजे. अशी त्यांची जाण्याविषयींची चंचलता पाहून चंद्रसेनराजानें उदईक गर्गाचार्याच्या सुमुहुर्तानें खुशाल गमन करावें असें सांगितलें. ही बातमी चंपकमालतीस कळतांच तिनेंही आपला बरोबर जाण्याचा हेतु प्रदर्शीत केला. ती ह्मणाली, पुष्पावतीबाईही बरोबर आहेत, तेव्हां मीही जाणार. मी साफ आतां राहणार नाहीं. असा तिचा दुराग्रह पाहून तिजला जाण्याची परवानगी देणें भाग पडलें. नंतर दुसरें दिवशीं दासदासी वगैरे मंडळी देऊन व थोडी बहुत फौजही संरक्षणाकरितां देऊन त्या चौघांस मार्गस्थ केलें. दैवयोगानें ते कुचदरकुच करीत आपल्या जन्मभूमीस सुखरूप येऊन पोहोंचले. पुत्र आल्याचें आनंदी वर्तमान त्यांच्या मातापितरांस कळल्यावर त्यांना जो हर्ष झाला त्याचा अजमास आतां वाचकांनींच करावा. मदनराय

राजानें नगर शृंगारण्यास हुकूम देऊन समारंभानें पुत्रास नगरांत आणिलें. शर्करा वांटण्यास आरंभ झाला. खजिना मोकळाकरून विप्रादिकांचे मनोरथ पूर्ण केले. कारागृहवाशी जनांची मुक्तता केली. दीपोत्साह सुरू झाली. याप्रमाणें जिकडे तिकडे आनंद झाला आहे, सर्वांच्या भेटी झाल्यावर पोषाख वांटण्यांत आले. विडे होऊन दरबार बरखास्त झाला. मग उभयतां स्त्रियांसहवर्तमान मातांना भेटले. तेव्हां त्यांनीं मुलांना पोटाशीं घट्ट धरून त्यांचें चुंबन घेतलें. अशा रीतीनें आपला संतोष प्रदर्शीत केला. राजपुत्रानें आपली व ह्या स्त्रिया कशा प्राप्त झाल्या या बद्दलची हकीकत जेव्हां सर्वांना सांगितली तेव्हां जनांचीं मनें दुःखाश्चार्यांनं दयांनीं परिप्लूत झालीं. संपूर्णांनी उभयतांचा धन्य वाद केला.

पुष्पावती आपल्या आईबापाना भेटण्याविषयीं उतावीळ झाली होती. परंतु तिकडील खबर कळण्याचा कांहींच संभव नव्हता. पण सुदैवानें चांगलें होऊं लागलें ह्मणजे सर्व मनाप्रमाणें घडून येतें. ती आपल्या नगराकडची चिंता करीत आहे तोंच मदनबाणाकडून निरोप आला कीं, आपलें मातापिता खुशाल असून तुमच्या प्रधानानीं त्या दुरात्म्या क्रूरसेनास अत्यंत कुशलतेनें कारागृहांत घातलें आहे. हें ऐकल्यानें पुष्पावतीस समाधान वाटलें हें ह्मणजे सांगावयास पाहिजे असें नाहीं.

कांहीं दिन लोटल्यावर एके दिवशीं सायंकाळीं